सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १०६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १७ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली यूट्यूबर ज्योती मल्होत्रासह सहा जणांना अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७हिसार**

पाकिस्तानला संवेदनशील माहिती पुरविल्याबद्दल सहा भारतीय नागरिकांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये हरियाणाच्या एका यूट्यूबर तरुणीचाही समावेश आहे. पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्यांची साखळी हरियाणा आणि पंजाबमध्ये सक्रिय असल्याचे सुरक्षा यंत्रणांनी सांगितले आहे. या साखळीत एजंट, आर्थिक सहाय्य करणारे आणि माहिती पुरविणारे लोक कार्यरत आहेत. हिसारमधील सिव्हिल लाईन्स पोलिसांनी सहा जणांना अटक केली.

यूट्यूबर तरूणीचे नाव ज्योती मल्होत्रा असून तिचे यूट्यूबवर 'ट्रॅव्हल विथ जो' या नावाचे चॅनेल आहे. सुरक्षा अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्योती मल्होत्राने कमिशन एजंटकडून व्हिसा मिळवून २०२३ साली पाकिस्तानचा दौरा केला होता. या दौऱ्यात दिल्लीतील पाकिस्तान उच्चायुक्तालयात काम करणाऱ्या एहसान-उर-रहीम ऊर्फ दानिश या व्यक्तीशी तिचा संबंध आला.

भारत सरकारने दानिशला पर्सन नॉन ग्रेटा (अनावश्यक व्यक्ती) घोषित करून त्याची उच्चायुक्तालयातून १३ मे



२०२५ रोजी हकालपट्टी केली होती. मिळालेल्या माहितीनुसार, त्यानेच ज्योतीची पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेशी (झखजी) करून दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. व्हॉट्सप, टेलिग्राम आणि स्नॅपचॅट सारख्या एन्क्रिप्टेड प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून ज्योती पाकिस्तानी ऑपरेटिव्ह शाकिर ऊर्फ राणा शाहबाजच्या संपर्कात होती. याचा फोन नंबर तिने जट रंधवा या नावाने सेव्ह केला होता.

सोशल मीडियाच्या माध्यमातून पाकिस्तानबद्दल सकारात्मक चित्र निर्माण करण्याचे काम पाकिस्तानी हँडलर्सकडून ज्योतीला देण्यात आले होते, अशी माहिती टाइम्स ऑफ इंडियाने त्यांच्या वृत्तात दिली आहे. सुरक्षा यंत्रणांनी केलेल्या चौकशीत २०२३ साली पाकिस्तानच्या दौऱ्याबाबत ज्योतीने सांगितले की, ती एका शिष्टमंडळाचा भाग होती.२०२३ नंतर ज्योतीने पुन्हा एकदा पाकिस्तानला भेट दिली होती. यावेळी ती अली एहसान नामक व्यक्तीच्या संपर्कात आली. ज्याने तिची ओळख इतर पाकिस्तानी गुप्तचर अधिकाऱ्यांची करून दिली. या काळात तिने संवेदनशील स्वरुपाची माहिती पाकिस्तानमधील तिच्या संपर्कातील लोकांना पाठविल्याचा आरोप केला जात आहे. ज्योती मल्होत्रावर भारतीय न्याय संहितेच्या कलम १५२ आणि ऑफिशियल सिक्रेट क्ट, १९२३ च्या कलम ३, ४ आणि ५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ज्योतीचा लेखी जबाब घेतल्यानंतर हे प्रकरण हिसारच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आले आहे.

## सिंधू जल करार स्थगित केल्याचा राग

## दुबईत पाकिस्तानी तरुणांकडून भारतीय तरुणाचा छळ, पाणीसुद्धा हिसकावले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७दुबई**

पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून दिलेल्या प्रत्युतरानंतर, भारत आणि पाकिस्तानमध्ये तणावाचे वातावरण आहे. याचबरोबोर दहशतवाद्यांना पोसणाऱ्या पाकिस्तान विरोधात भारताने अनेक कठोर पाऊले उचलली आहे. याचाच भाग केंद्र सरकारने सिंधू जल करार स्थगित केला आहे. भारताने सिंधू जल करार स्थगित केल्याच्या रागातून दुबईमध्ये २६ वर्षांचा भारतीय तरुणाचा पाकिस्तानी तरुणांनी छळ केल्याचे प्रकरण समोर आले आहे.

उत्तराखंडमधील उधम सिंह नगर जिल्ह्यातील किच्छा येथील रहिवासी असलेल्या २६ वर्षीय विशाल दुबईमध्ये पाकिस्तानी तरुणांच्या द्वेषाचा बळी ठरला. दुबईमध्ये पाकिस्तानी तरुणांनी विशालला अनेक दिवस उपाशी ठेवले याचबरोबर त्याला प्यायला पाणीसुद्धा दिले नाही. विशालला मारहाणीसह त्याचा पासपोर्ट हिसकावण्यासारखे क्रूर प्रकारही सहन करावे लागले. उधम सिंह नगरचे पोलीस अधिक्षक मणिकांत मिश्रा यांच्या तत्परतेमुळे विशालची दुबईमधून सुटका करण्यात आली आहे.अभियांत्रिकीचे शिक्षण घेतलेला विशाल नोकरीसाठी ८ मे २०२५ रोजी दुबईला गेला होता. त्याला एजंट समीर अहमदने नोकरीचे आमिष दाखवून तिथे पाठवले होते. तिथे विशालला काही पाकिस्तानी तरुणांसोबत एका कंपनीत काम करायचा. पण भारत आणि पाकिस्तानमधील युद्धजन्य परिस्थिती आणि भारताने सिंधू पाणी करार स्थगित केल्याने संतप्त झालेल्या या पाकिस्तानी तरुणांनी विशालवर आपला राग काढला आणि त्याचा मानसिक व शारिरीक छळ केला.

## मुंबई विमानतळावरून आयएसआयएसशी संबंधित दोघांना अटक, दोघांवरही ३ लाखांचे बक्षीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १७ मुंबई**

राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) पुणे येथे २०२३ मध्ये आईडी प्रकरणात दोन फरार आरोपींना मुंबई विमानतळावरून अटक केली. हे दोघेही प्रतिबंधित दहशतवादी संघटना आयएसआयएस स्लीपर मॉड्यूलशी संबंधित असल्याची माहिती एनआयएकडून देण्यात आली.



अब्दुल्ला फैयाज शेख उर्फ डायपरवाला आणि तल्हा खान अशी अटकेत असलेल्या दोघांची नावे आहेत. हे दोघेही जकार्ता, इंडोनेशिया येथे लपून बसले होते आणि भारतात परतण्याचा प्रयत्न करत असताना मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर (टी२) इमिग्रेशन विभागाने त्यांना अडवले. त्यानंतर एनआयएच्या पथकाने त्यांना ताब्यात घेऊन अटक केली. हे दोघेही गेल्या दोन वर्षांपासून फरार होते. मुंबईतील एनआयए विशेष न्यायालयाने त्यांच्याविरोधात अजामीनपात्र वॉरंट्सही जारी केले होते. तसेच, दोघांवर माहिती देणाऱ्याला प्रत्येकी ३ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते.या प्रकरणात अटक करण्यात आलेले आणखी आठ आरोपी आहेत, जे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. हे सर्व आरोपी आयएसआयएसच्या विचारसरणीनुसार भारतात दहशतवादी कारवाया घडवून आणून देशात शांतता आणि सामाजिक सलोखा बिघडवण्याच्या कटात सहभागी होते. त्यांनी हिंसाचार व दहशतीच्या मार्गाने भारत सरकारविरोधात युद्ध पुकारून देशात इस्लामिक राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला होता.

अब्दुल्ला फैयाज शेख याने पुण्यातील कोंढवा भागात भाड्याने घेतलेल्या घरातून त्यांनी स्फोटके तयार केली होती. २०२२ ते २०२३ या कालावधीत या ठिकाणी बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण शिबिर घेतले गेले होते, तसेच त्यांनी बनवलेल्या आयईडीचे नियंत्रणीत स्फोट घडवून आणून त्याची चाचणीही घेतली होती.या प्रकरणात एनआयएने याआधीच १० आरोपींविरोधात बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (यूएपीए), स्फोटके अधिनियम, शस्त्र अधिनियम आणि भारतीय दंड विधानच्या विविध कलमांनुसार आरोपपत्र दाखल केले आहे. याप्रकरणी आतापर्यंत मोहम्मद इमरान खान, मोहम्मद युनुस साकी, अब्दुल कादिर पठाण, सिमाब नसीरुद्दीन काझी, झुल्फिकार अली बारोदवाला, शामील नाचन, आकिफ नाचन आणि शहनवाज आलम यांना अटक झालेली आहे.

## आयकर अधिकारी सांगून छगन भुजबळ यांच्याकडे मागितली एक कोटीची खंडणी; युवक अटकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नाशिक**

माजी मंत्री छगन भुजबळ वापरत असलेल्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधून 'मी इन्कम टॅक्स अधिकारी आहे, तुमच्या साहेबांच्या त्र्यंबकेश्वर येथील फार्महाउसवर आयकर विभागाची रेड पडणार आहे, त्या टीम मध्ये मी आहे. तुम्हाला मदत हवी असल्यास एक कोटी रूपये द्यावे लागतील..' अशाप्रकारे संवाद साधून खंडणीची रक्कम पेठ तालुक्यातील करंजाळीजवळ स्वीकारली असता नाशिक शहर पोलिस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखा युनिट-१च्या पथकाने रंगेहात जाळ्यात घेतले. राहुल दिलीप भुसारे



(२७,रा.करंजाळी) असे अटक केलेल्या संशयिताचे नाव आहे.


माजी मंत्री छगन भुजबळ यांचा मोबाइल क्रमांक ऑनलाइन पद्धतीने मिळविल्यानंतर संशयित राहुल याने पहिल्यांदा २३ एप्रिल रोजी संपर्क साधला. हा क्रमांक भुजबळ यांचे स्वीय सहायक फिर्यादी संतोष गायकवाड यांच्या क्रमांकावर डायव्हर्ट केलेला असल्याने त्यांनी कॉल घेतला. यावेळी राहुल याने स्वत:ला आयकर विभागाचा अधिकारी सांगून सुरूवातीला १ कोटी ६० लाख रूपयांची मागणी केली. यानंतर पुन्हा २ मे रोजी संपर्क साधून तडजोड करत वरिष्ठ अधिकाऱ्यांना जास्त रक्कम द्यावी लागेल, असे सांगून १ कोटी रूपयांची खंडणीची मागणी केली. ही बाब गायकवाड यांनी थेट पोलिस आयुक्त संदिप कर्णिक यांना सांगितली. यानंतर गुन्हे शाखेचे उपायुक्त प्रशांत बच्छाव यांना याबबत कर्णिक यांनी सुचना देऊन तातडीने कारवाईचे आदेश दिले. गुन्हे शाखा युनिट-१चे पोलिस निरिक्षक मधुकर कड यांनी याप्रकरणी दोन पथके तयार केली. एका पथकाने गुजरात गाठले. धरमपूर येथे राहुल हा पैसे घेण्यासाठी आला नाही. त्याने करंजाळी येथे बोलविले. त्यावेळी पथकाने करंजाळी गाठली. तेथे पैशांची बॅग त्याने स्वीकारली असता गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले. त्याच्याविरूद्ध अंबड पोलिस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राहुल हा पदवीधर असून त्याचे यापुर्वी कुठलेही गुन्हेगारी रेकॉर्ड नसून केवळ झटपट पैसे कमविण्याच्या उद्देशाने त्याने हा प्रकार केल्याचे प्रशांत बच्छाव यांनी सांगितले.

## बीड पुन्हा हादरले! पेट्रोल पंपावरून तरुणाचं अपहरण, डोंगरपट्ट्यात नेऊन लाठ्याकाठ्या- बेल्टने अमानुष मारहाण : सात जणांना अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७बीड**

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण ताजे असतानाच बीडमध्ये आणखी एका तरुणाने अपहरण करून त्याला बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. बीडच्या परळीमध्ये तरुणाचे पेट्रोल पंपावरून अपहरण केले. त्यानंतर त्याला लाठ्याकाठ्याने आणि बेल्टने अमानुष मारहाण करण्यात आली. याप्रकरणी परळी ग्रामीण पोलिस ठाण्यात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बीडच्या परळी येथील पेट्रोल पंपासमोरून तरुणाचे अपहरण करण्यात आले. शिवराज हनुमान दिवटे या तरुणाचे शुक्रवारी सायंकाळी ४ वाजता काही तरुणांनी अपहरण केले. जलालपूर भागातील



डोंगरपट्ट्यात असलेल्या रत्नेश्वर मंदिर परिसरात नेऊन या तरुणाला लाठ्याकाठ्या आणि बेल्टने अमानुष मारहाण करण्यात आली. सांप्रदायिक कार्यक्रमाच्या जुन्या वादावरून तरुणाला मारहाण करण्यात आली. समाधान मुंडे आणि त्याच्या इतर साथीदारांनी शिवराज दिवटेया तरुणाला ही मारहाण केली. या घटनेमुळे बीडमध्ये खळबळ उडाली. काही नागरिकांनी तरुणाला मारहाण करताना पाहिले त्यांनी आरोपींना रोखले त्यामुळे तरुणाचे प्राण वाचले. या मारहाणीमध्ये तरुण गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर सुरूवातीला परळी येथे उपचार करण्यात आले. पण पुढील उपचारासाठी त्याला अंबाजोगाईतील स्वराची रुग्णालयात हलवण्यात आले. या मारहाणीचा व्हिडीओ देखील समोर आला असून तो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

## महायुती फुटली? नवी मुंबईत शिवसेनेचे एकला चलो, अमरावतीमध्ये भाजप स्वबळावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुका सप्टेंबर अथवा ऑक्टोबरमध्ये होण्याची शक्यता आहे. कारण सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. कोर्टाच्या आदेशानंतर राजकीय पक्षाने निवडणुकीची तयारी जोरात सुरू केली आहे. सत्ताधारी महायुती (भाजप, शिवसेना-शिंदे गट, राष्ट्रवादी-अजित पवार गट) एकत्रितपणे निवडणुका लढवणार असल्याचे देवेंद्र फडणवीस अन् एकनाथ शिंदे यांनी सांगितलेय. पण काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होऊ शकतात. मुख्यमंत्र्यांनी तयारीवर जोर दिला आहे, तर शिवसेनेने रणनीती आखली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुती एकमेकांसमोर उभे ठाकण्याची शक्यता आहे. नवी मुंबई आणि




अमरावती दोन्ही ठिकाणी भाजप आणि शिवसेनेकडून स्वबळावर लढण्याची तयारी सुरू केली आहे.

शिवसेना शिंदे गटाचे खासदार नरेश मस्के यांनी नवी मुंबईत स्वबळावर लढण्याचे संकेत दिले. तर दुसरीकडे भाजपच्या माजी खासदार नवनीत राणा यांनीही अमरावाती महापालिकामध्ये भाजप स्वबळावर लढणार असल्याचे जाहीर केलेय. त्यामुळे महापालिका निवडणुकीत महायुती एकमेकांसमोर उभे राहणार असल्याचे चित्र दिसतेय.

### अमरावतीत भाजपचा स्वबळाचा नारा

भाजप नेत्या नवनीत राणा यांनी मोठं विधान करत अमरावती महानगरपालिका निवडणुकीत भाजप स्वतंत्रपणे लढणार असल्याची घोषणा केली. त्या म्हणाल्या, अमरावती महानगरपालिकेवर भाजपचं महापौर बसेल. याप्रसंगी अमरावती भाजप शहर जिल्हाध्यक्षपदी नितीन धांडे यांची नियुक्ती झाली. भाजप कार्यालयात आयोजित पदग्रहण समारंभात नवनीत राणा यांच्यासह पक्षाचे सर्व प्रमुख नेते व पदाधिकारी उपस्थित होते. राणा यांनी कार्यकर्त्यांना एकजुटीने निवडणूक लढण्याचे आवाहन केले. पक्षाने स्थानिक पातळीवर जोरदार तयारी सुरू केली आहे.

## राऊतांनी पुस्तकाचं श्रेय स्वप्ना पाटकरांना द्यावं; नीलम गोऱ्हेंनी वर्मावरच घाव घातला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७मुंबई**

शिवेसना उद्धव बाळासाहेब ठाकरे सेना पक्षाचे खासदार संजय राऊत लिखित नरकातला स्वर्ग पुस्तकावरून राज्यातील राजकारण चांगलंच तापलं आहे.यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या नेत्या तथा विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी प्रतिक्रिया देताना, राऊतांच्या वर्मावरच घाव घातला आहे. राऊतांनी पुस्तकाचं श्रेय, स्वप्ना पाटकरांना द्यावं, अशी खोचक प्रतिक्रिया देताना राऊतांच्या जुन्या प्रकरणातील जखमेवरची खपली काढत, डिवचलं आहे.

ईडीकडून अटक होणार होती, त्यावेळी एकनाथ शिंदेंनी आपल्याला फोन केल्याचा गौप्यस्फोट संजय राऊत यांनी केला. भाजप नेत्यांशी बोलतो, असे म्हटले होते. तसा पुस्तकात देखील संदर्भ दिला आहे. त्यावर नीलम गोऱ्हे म्हणाल्या, असे फोन ऐकायला आपल्याकडे 'कर्णपिशाच्च' नाही. संजय राऊत कशासाठी जेलमध्ये गेले होते? कुठला सत्याग्रह, आंदोलन असे काहीच नाही. पत्राचाळीतील गरिब लोकांच्या पैशांमध्ये त्यांनी अफरातफर केली. मनी लॉंडरिंग केले. साक्षीदारांवर दबाव आणला. धमकावल. स्वप्ना पाटकर यांच्यावर दबाव आला. यात ते नरकातल्या स्वर्गात गेले.

## संपादकीय ......

# पाकिस्तान काकुळतीला!

आमच्या माता-भगिनींच्या कपाळावरील सिंदूर पुसण्याचा परिणाम काय होतो, हे आता प्रत्येक दहशतवाद्याला आणि त्यांच्या संघटनांना समजले असेल. 'ऑपरेशन सिंदूर'मुळे पाकिस्तान हतबद्ध झाला. परंतु तरीदेखील जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही. मोहिमेत भारताचा मोस्ट वाँटेड दहशतवादी मसूद अझहर याच्या कुटुंबातील १४ सदस्य मारले गेले. या सर्वांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक कोटी याप्रमाणे १४ कोटी रुपये देण्याचा निर्णय पाकिस्तान सरकारने घेतला. पंतप्रधान शाहबाझ शरीफ यांनी त्यांच्यासाठी विशेष 'शुहाद पॅकेज'ची घोषणा करत दहशतवाद्यांची उघड पाठराखण केली आहे. भारताकडे वक्र नजरेने पाहिल्यास काय स्थिती होते, हे पाकिस्तानने अनुभवले आहे, परंतु तरीदेखील शत्रूचा कोणताही डाव पाकिस्तानी सशस्त्र दलांचा संकल्प कमजोर करू शकत नाही, अशी दर्पोक्ती पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल सय्यद असीम मुनीर यांनी केली आहे. भिकेला लागलेल्या पाकला आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून गेल्या आठवड्यात एक अब्ज डॉलर्सची मदत मिळाली.

आता १.०२ अब्ज डॉलर्सचा दुसरा हप्ताही देण्यात आला. पाकिस्तान या निधीचा वापर सीमापार दहशतवादाला चालना देण्यासाठी करू शकतो, असा आक्षेप भारताने घेतला होता. तो खरा ठरताना दिसतो. पाकिस्तानच्या परकीय चलन साठ्यात सातत्याने घट होत आहे. युद्धात पाकचे कमालीचे नुकसान झाले असून, त्याच्या डोक्यावर १३१ अब्ज डॉलर्सचे कर्ज आहे. उधार-उसनवार करून दिवस ढकलायची वेळ देशावर आली आहे. मात्र भारताच्या अभूतपूर्व अशा लष्करी कारवाईमुळे त्याच्या डोळ्यासमोर काजवे चमकले असून, या जळजळीत वास्तवाची जाणीव झाली असावी. त्यामुळेच भारताकडे सिंधू जल करार पुन्हा सुरू करण्याची विनंती पाकने केली आहे.पहलगाममध्ये अतिरेक्यांनी केलेल्या निर्दयी हल्ल्यानंतर भारताने सिंधू पाणी वाटप करार स्थगित केला. आता भारताने घेतलेल्या या निर्णयाचा फेरविचार करावा, चर्चेसाठी तयार असल्याचे पत्र पाकिस्तानच्या जलसंपदा मंत्रालयाचे सचिव सय्यद अली मूर्तजा यांनी भारताला पाठवले आहे. पाण्याविना शेती संकटात आल्याने पाकिस्तान अक्षरशः काकुळतीला येऊन गयावया करू लागला आहे. १९६० साली स्वाक्षरी झालेल्या सिंधू करारानुसार, भारताला सुमारे ३० % आणि पाकिस्तानला उर्वरित ७० % जलप्रवाह वापरण्याचा अधिकार देण्यात आला होता. परंतु आता भारताने पाकिस्तानला पुराबद्दलचे इशारे देणेदेखील थांबवले आहे. म्हणजे उद्या अचानक पूर आल्यास पिकांची हानी होईलच. परंतु तेथे जीवितहानीचाही धोका संभवतो.

भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि पाकिस्तानचे अध्यक्ष अयूब खान यांनी केलेल्या सिंधू जल करारानुसार, पूर्वेकडील रावी, बियास आणि सतलज या तीन नद्यांचे पाणी भारताला मिळत आहे; तर पश्चिमेकडील सिंधू, झेलम आणि चिनाब या नद्यांचे पाणी पाकिस्तानला मिळते. स्वातंत्र्यानंतर पाकिस्तानने काश्मीरमध्ये टोळीवाल्यांना घुसवून कुरापत काढली, त्यावेळी म्हणजे १९४८ साली भारताने सिंधूचा प्रवाह तात्पुरता रोखला होता. तेव्हा पाकिस्तानने संयुक्त राष्ट्रांमध्ये तक्रार केल्यानंतर, जागतिक बँकेने या प्रश्नात मध्यस्थी केली. मूळ करारानुसार भारताच्या हिश्श्यात ४१ अब्ज घनमीटर, तर पाकिस्तानच्या वाट्याला ९९ घनमीटर पाणी येते. परंतु उभय देशांना शेती आणि जलविद्युत प्रकल्पांसारख्या कामांकरिता एकमेकांच्या वाट्याच्या पाण्याचा मर्यादित वापरही करता येतो. मात्र सिंचन, शेती आणि पिण्याच्या पाण्यासाठी पाकिस्तान सिंधूच्या पाण्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे.पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेत कृषीचा वाटा २३ टक्के असून, ६८ टक्के लोक पोटापाण्यासाठी शेतीवर अलंबून आहेत. म्हणूनच सिंधूचे पाणी रोखल्यामुळे पाकिस्तानची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त होईल. खेड्यापाड्यातील जनतेला याची झळ पोहोचेल. आजच पाकिस्तानसमोर खालावलेली भूजल पातळी, शेतजमिनीचे क्षारीकरण आणि पाणी साठवण्याची अल्प क्षमता हे प्रश्न आ वासून उभे आहेत. त्यामुळे पाणीटंचाई निर्माण झाल्यास तेथील ग्रामीण जनतेचा उद्रेक होईल, लोक रस्त्यावर येऊन सरकारला जाब विचारतील. अशावेळी पाकिस्तानच्या शाहबाझ शरीफ सरकारचे अस्तित्वच धोक्यात येऊ शकते. आता भारत पाणी प्रवाहाविषयीची आकडेवारी पाकिस्तानला देणे तातडीने थांबवू शकतो. सिंधू आणि तिच्या उपनद्यांच्या पाण्याच्या वापरावर कोणतेही निर्बंध राहणार नाहीत.सिंधू, झेलम आणि चिनाब या पश्चिमेकडील नद्यांवर भारत धरणेही बांधू शकतो. सिंधू जल करार स्थगितीचा निर्णय एकतर्फी आणि बेकायदेशीर असून, तो आमच्या जनतेवरील व अर्थव्यवस्थेवरील हल्ला असल्याचा आरोप पाकिस्तानने केला आहे. पहलगाममध्ये निष्पाप पर्यटकांना त्यांच्या कुटुंबीयांसमोर गोळ्या घालताना पाकिस्तानला लाज वाटली नाही. पाकने राक्षसी कृत्ये करावीत आणि भारताने ती निमूटपणे सहन करावीत, हा काळ केव्हाच मागे पडला आहे. भारताच्या केंद्रीय सुरक्षा समितीने सिंधू जल करार स्थगित ठेवण्याचा निर्णय घेतला असून, त्यावर या विनंतीचा कोणताही परिणाम होण्याची तूर्तास तरी शक्यता दिसत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात, रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही, असे ठामपणे म्हटले होते.करार स्थगितीचा निर्णय हा मुळीच बेकायदेशीर नाही. कारण मूळ करारातच बदलत्या परिस्थितीमुळे त्याचा फेरविचार करण्याची तरतूद आहे. पाकने अतिरेकी प्रवृत्तींना खतपाणी घालूनच ही परिस्थिती निर्माण केली. भारताने करार स्थगित केल्यानंतर, जम्मू-काश्मीरमधील चिनाब नदीवरील बागलिहार आणि सलाल जलविद्युत प्रकल्पांच्या जलाशयांची स्वच्छता करण्याचे आणि गाळ काढण्याचे काम हाती घेतले आहे. यामुळे खालच्या भागात पाण्याचा प्रवाह अनियमित झाला आहे. परिणामी पाकमधील खरिपाच्या पेरण्या धोक्यात आल्या आहेत. अर्थात सिंधूचे पाणी अडवून, त्याची साठवण करण्यासाठी भारताला धरणे बांधावी लागतील. सद्यःस्थितीत भारत पाकिस्तानचे पाणी जास्तीत जास्त पाच ते दहा टक्के इतके कमी करू शकतो. परंतु त्याचा परिणामही पाकिस्तानला जाणवेल, असा होणार आहे. भारत हा माणुसकी जपणारा देश असला, तरी नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही, हे आपल्याला ठाऊक आहे!

# आरोग्यदायी आंबा कसा असायला पाहिजे

## सगळ्यांना सगळं समजते पण वळत नाही

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक**

केमिकल विरहित आंबा कसा पिकलेला आहे हे कसे समजायचे.*हमखास बाजारात ,विविध प्रकारच्या केमिकल युक्त पुड्या, कार्बाइड च्या पुड्या, चायना च्या केमिकल पाऊचेस, इथिलिन स्प्रे इत्यादीचा सर्रास वापर केल्या जात आहे.यामुळे विविध प्रकारचे आजार उत्पन्न होत आहेत.केमिकलने पिकवलेले आंबे हे स्लो पॉयझन सारख काम करतात .यापासून अप्रत्यक्षपणे आजारी होत आहेत ते लवकर लक्षात येत नाही.

**विचार करण्यासारखे :-- ---**उदा:- प्रत्येक शहरात मोठ्या प्रमाणात आंबा येत असतो, हा सर्व आंबा जवळपास एकदम पिवळा कसा काय दिसतोय? समजण्यासारखे असे की,ज्या दिवशी झाडावरून हिरवा आंबा तोडल्या जातो,त्याच दिवशी काही व्यापारी क्रॅटमध्येच विविध प्रकारच्या केमिकल च्या पुड्या टाकतात.वाहतुकीतून बाजारात पोहोचेपर्यंत हा सर्व हिरवा कच्चा माल पिवळा दिसतो.जवळपास हे सर्व केमिकल युक्त असते.

समजते पण उमजत नाहीपुष्कळ नागरिकांना पिवळा आंबाच आवडतो , ग्राहक सुद्धा पिवळ्या आंब्याची मागणी करतो.कारण त्यांनाही इन्स्टंट पिकलेला आंबा हवा असतो.ग्राहकांनी जर कच्च्या कैरीची मागणी केली तर, घरात



चार पाच दिवस पिकविण्यासाठी ठेवले तर केमिकल विरहित आंबा खायला मिळू शकतो.जर सर्वांनी कच्च्या कैरीची मागणी केली तर असे प्रकार मुळीच घडणार नाही.जेव्हा अशा प्रकारच्या इन्स्टंट कार्बाइड इथिलीन चायनाच्या पुड्या नव्हत्या तेव्हा कसे आंबे पिकायचे? याची ही जाणीव असु द्या.

आपणास आंबा नॅचरल पद्धतीने पिकवायचे असल्यास,कामधेनु नॅचरल मध्ये,आंबा पिकवण्या बद्दल माहिती दिल्या जाते

**ओळख-आंबा डोळ्याने न खाता, चवीने खा.**

आंबा हिरवा असतानाही, कशा प्रकारचा पिकलेला असतो, हे कसे ओळखावे.उदा.केशर आंबा जर हिरवा असतांना बुडापासून दाबला तर,दबत नसल्यास पिकलेला नाही.हिरवा असूनही बुडापासून दबत असल्यास, नरम असल्यास हा आंबा पिकलेला आहे असे समजावे.

हिरवा असतो पण पिकलेला राहतो. केमिकल विरहित असल्यामुळे,हा पिकलेला आंबा हिरवा असतानाही सहा ते सात दिवस टिकतो.लवकर खराब होत नाही.

विविध प्रकारचे आंबे, वेगवेगळ्या पद्धतीने, प्राकृतिक पद्धतीने पिकवल्या जाऊ शकतात.*जसे* :- अडुळसाचे पाने, टेंभुर्णीचे पाने,पळसाचे पाने ,गवत, गोणपाट , गव्हाच्या कोंडा , कुटार अश्या विविध प्रकार च्या पद्धती ने आंबा पिकवला जाऊ शकतो.काही आंबे शाक वर किंवा पाडावर आलेला असेल तर आंबा तसाच पिकवला जाऊ शकतो.काहीही करायची गरज वाटत नाही.कामधेनु नॅचरल द्वारे, या बाबत चांगले आरोग्यदायी आंबे मिळण्याकरिता जनजागृती केली जात आहे.आरोग्यदायी आंबे मिळण्याकरिता आणिअधिक माहितीसाठी आपण संपर्क करू शकता,

**कामधेनु नॅचरल**
बडनेरा रोड, अमरावती.
मो.७७२००७७५५०, ८८३०६७७४४७




## प्रेग्नंसीमध्ये चिकन खाणे योग्य की आयोग्य ? जाणून घ्या सविस्तर

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक**

गरोदरपणात योग्य आहार घेणे हे आई आणि बाळ दोघांच्याही आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असते. प्रोटीन, व्हिटॅमिन्स, मिनरल्स आणि फायबर्स यांचा समावेश असलेला संतुलित आहार गर्भाच्या वाढीस मदत करतो आणि आईला आरोग्यदायी ठेवतो. अनेकदा गरोदर महिलांना चिकन खाणे योग्य आहे की नाही असा प्रश्न पडतो. चला जाणून घेऊया याबाबत सविस्तर माहिती.



प्रेग्नंसीमध्ये चिकन खाणे सुरक्षित आहे का?

होय, चिकन हे गरोदर महिलांसाठी सुरक्षित आणि पौष्टिक अन्न आहे, पण ते योग्य पद्धतीने शिजवणे आणि स्वच्छता पाळणे अत्यावश्यक आहे. चिकनमध्ये लीन प्रोटीन भरपूर प्रमाणात असते जे बाळाच्या शारीरिक आणि मेंदूच्या विकासासाठी अत्यंत महत्वाचे असते. विशेषतः दुसऱ्या ट्रायमेस्टरमध्ये जेव्हा भ्रूणाची वाढ झपाट्याने होते.

चिकनमध्ये बी ग्रुप व्हिटॅमिन्स विशेषतः इ६ आणि नियासिन असतात जे ऊर्जा निर्मिती आणि चयापचय प्रक्रियेस चालना देतात. तसेच झिंक आणि आयर्नचीही चांगली मात्रा चिकनमध्ये आढळते जे रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी आणि शरीरात ऑक्सिजन पोहोचवण्यासाठी उपयोगी असते.

याशिवाय, चिकनमध्ये कमी चरबी असते, त्यामुळे ज्या महिला गरोदरपणात वजन नियंत्रणात ठेवू इच्छितात त्यांच्यासाठीही हे एक उत्तम पर्याय ठरतो. तसेच, चिकनमध्ये विटॅमिन -, विटॅमिन ए आणि सेलेनियमसारखे घटक असतात जे आई आणि बाळ दोघांचेही आरोग्य सुधारतात.

चिकन बनवताना कोणती काळजी घ्यावी?

चिकनमध्ये साल्मोनेला यांसारख्या हानिकारक जीवाणू असू शकतात. त्यामुळे चिकन नीटपणे पूर्ण शिजवणे गरजेचे आहे.

अर्धवट किंवा कच्चं चिकन खाल्ल्याने अन्नातून होणारे आजार होऊ शकतात, जे गर्भवती महिलांसाठी धोकादायक ठरू शकतात.

चिकन स्वच्छतेने तयार केलेले, प्रक्रिया नसलेले (पेप-ग्लिर्शीशव) आणि योग्य प्रमाणात खाल्ले गेले तर ते पूर्णतः सुरक्षित आहे. सॉसेजसारख्या प्रोसेस्ड चिकन उत्पादनांमध्ये जास्त मीठ असतो, त्यामुळे अशा गोष्टी मर्यादित प्रमाणात खाणे शिफारसीचे आहे.

शक्य असल्यास ऑरगॅनिक किंवा फ्री-रेंज चिकन वापरावे.

# बियाणे घरचे असो अथवा विकतचे, पेरणी अगोदर ही सोपी तपासणी कराच? वाचा सविस्तर

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक**

खरीप हंगाम जवळ आला की शेतकऱ्यांची पेरणीची लगबग सुरू होते. उत्पादनात भरघोस वाढ व्हावी, यासाठी बियाण्याची निवड हा पहिला आणि महत्त्वाचा टप्पा ठरतो.

अनेकदा शेतकरी बांधव दरवर्षी बाजारातून नवे बियाणे खरेदी करतात. परंतु, हे बियाणे महाग असतानाही त्याची उगवणक्षमता कितपत योग्य आहे, हे निश्चित नसते.

अशा वेळी वेळ, श्रम आणि पैसा वाया जाण्याचा धोका असतो. त्यामुळेच उगवणक्षम बियाणे वापरणे हा खरीप यशस्वी करण्याचा मूलमंत्र ठरतो.

**गोणपाट वापरून बियाणे उगवण क्षमता चाचणी कशी करावी?**-बियाण्याच्या प्रत्येक पोत्यातुन खोलवर हात घालुन मुठभर धान्य बाहेर काढा, सर्व पोत्यातुन काढलेले धान्य एकत्र करून घ्या.

गोणपाटाचे सहा चौकनी तुकडे घेऊन स्वच्छ धुवून घ्या. एक तुकडा जमीनीवर पसरवा.

पोत्यातुन काढलेल्या धान्यातुन सरसकट १०० दाणे मोजून दडी-दोन से.मी. अंतरावर (बोटाचं एक कांड अंतरावर) १०-१० च्या रांगेत गोणपाटाच्या एक तुड्यावर ओळीत ठेवावे अशा प्रकारे १०० दाण्याचे ३ नमुने तयार करावे.

गोणपाटावर चांगले पाणी शिंपडून ओले करावे व बियाण्यांवर दुसरा गोणपाटाचा तुकडा अंथरून पुन्हा चांगले पाणी मारावे.

गोणपाटाच्या तुकड्याची बियाण्यांसकट गुंडाळी करून थंड ठिकाणी सावलीत ठेवा त्यावर अधून-मधून पाणी शिंपडून ओले ठेवा.

६-७ दिवसानंतर ही गुंडाळी जमीनीवर पसरून उघडा चांगले कोंब आलेले दाणे वेगळे करा व मोजा तिनही गुंडाळ्याची सरासरी काढुन १०० दाण्यांपैकी ७० किंवा त्यापेक्षा जास्त दाणे जर चांगले कोंब आलेले असतील तर बियाणे बाजारातील बियाण्यासारखेच गुणवत्तेचे आहे असे समजा आणि शिफारशी प्रमाणे मात्रेत पेरणीसाठी वापरा.

जर उगवण झालेल्या बियाण्याची सरासरी संख्या ७० पेक्षा कमी असेल तर एकरी बियाण्यांचे प्रमाण थोडे वाढवून पेरणी करा. पेरणी करताना बियाण्यास बुरशीनाशकांची व जिवाणू संवर्धकाची प्रक्रिया करण्यास विसरू नका.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# वस्त्रोद्योग प्रधान सचिव अंशु सिन्हा भेट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती,**

वस्त्रोद्योग विभागाचे प्रधान सचिव अंशु सिन्हा यांनी आज नांदगाव पेठ येथील पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क आणि बडनेरा येथील राज्य रेशीम पार्कला भेट दिली. नांदगाव पेठ येथील पीएम मित्रा टेक्सटाईल पार्कमधील कामाची पाहणी अंशु सिन्हा यांनी केली. राज्य बंडखोर सौरभ कटियार, वस्त्रोद्योग विभाग उपसचिव श्रीकृष्ण पवार, रेशीम सुरक्षा कार्यालयाचे संचालक विनय मुन, वस्त्रद्योग संजय संजय, वस्त्रयोग विभागाचे उपसचिव गणेश वंडकर, सुरक्षाक हेमंत लाडगावकर, तहसिलदार विजय लोखंडे होते.त्यानंतर श्रीमती सिन्हा यांनी बडनेरा येथील रेशिम पार्क तुती व तसर रेशीम शेतीची पाहणी केली. राजीम शेतीत नियोजित कामं बनवलेली सूचना. तसेच राज्य रेशीम पार्कमध्ये टसरचे वृक्षारोपण करण्यात आले.श्रीमती सिन्हा यांनी राज्य रेशीम पार्कमधील रिक्त पदांविषयी चर्चा केली.



अधिकारी व व्यवसायाची भरती करण्याबाबत चर्चा केली. त्यांनी राज्य रेशीम पार्कमधील कामगार संघटना समाधान व्यक्त केले.

# पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थी सत्कार व निरोप समारंभ संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती येथे पदवीचे अंतिम वर्ष पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ व महाविद्यालयातील माजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम पी. आर. पोटे पाटील शैक्षणिक संकुलाचे उपाध्यक्ष मा.श्रेयस पोटे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्रेयस पोटे पाटील यांनी विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यात सत्य, जिद्द, चिकाटी व प्रामाणिकता जवळ असेल तर यश संपादनासाठी वेळ लागणार नाही. त्यासाठी जिद्द महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांमध्ये यशस्वी होण्यासाठी अनेक स्पर्धात्मक परीक्षेला सामोरे जाणे गरजेचे आहे. आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. या स्पर्धेत जो टिकेल तोच खरा यशस्वी होईल, तरी या पुढे खूप काही शिकण्यासारखे आहे. खूप शिका मोठे व्हा, आई-वडिलांसोबत गुरूंचेही नाव मोठे करा, असा संदेश दिला.कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे यांनी विद्यार्थ्यांनी



प्रामाणिक प्रयत्न करावे व संयमाने आपल्या उद्दिष्टाकडे वाटचाल करावी असे प्रतिपादन अध्यक्षीय मनोगतातून व्यक्त केले. यावेळी राष्ट्रीयकृत बँक, कृषी विभाग, राष्ट्रीय गृहनिर्माण बँक इ. आस्थापनेवर निवड झालेल्या महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा सत्कार महाविद्यालया तर्फे संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्रेयश पोटे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी गुणवंत विद्यार्थी व अंतिम वर्षातील विद्यार्थी यांनी आपल्या मनोगता मधून महाविद्यालयाविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांना आठवण भेट देखील देण्यात आली.सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृषी महाविद्यालयाचे उपप्राचार्य नितेश चौधरी यांनी केले तर सूत्रसंचलन वनस्पती रोगशास्त्र विभागाचे प्रा. राहुल कळसकर व वनस्पतीशास्त्र विभागाच्या डॉ. अदिती राजने यांनी केले. या प्रसंगी शिक्षण विभाग प्रमुख प्रा. गजानन अढाऊ, प्रा. श्वेता देशमुख, प्रा. हेमंत पवार, प्रा. मनोज इंगळे यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आयुष्याचा मागोवा घेऊन त्यांना भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रा. श्वेता गणवीर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.-

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १७ मे २०२५ — शहर/ग्रामिण

## राजूरा बाजार येथे सावकारी धाड

### दस्ताऐवजसह ९.९७ लाख रोकड जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७ वरुड–** वरूड तालुक्यातील राजुरा बाजार येथे सहकार विभागाने टाकलेल्या धाडीत निलेश सिध्देश्वर साबळे यांच्या घरातून संशयास्पद दस्ताऐवजसह ९ लाख ९७ हजार ४९९ रुपयाची रोकड अलमारीत आढळून आली. त्यामुळे सहकार विभागाने सदरची रोकड जप्त केली आहे. जिल्हा उपनिबंधक कार्यालयात अवैध सावकारी संदर्भात तक्रार प्राप्त झालेली होती.सदर तक्रारीचे अनुषंगाने कारवाई करिता जिल्हा उपनिबंधक शंकरकुंभार यांनी तात्काळ एका धाड पथकाची नेमणूक करुन वरुडपोलीस स्टेशन हद्दीतील राजूरा बाजार येथील रहीवासी निलेश सिध्देश्वर साबळे यांचे राहते घरी धाड व झडतीची कारवाई केली. कारवाई पथकात सहायक निबंधक आशिष चर्जन, सुधीर मानकर, उज्ज्वला मोहोड़, नंदकिशोर जवंजाळ, मयूर कोहळे, रोशन चौधरी, अंजली नांदुरकर, चंद्रकांत केंद्रे यांचा सहभाग होता. निलेश साबळे यांचे घरी धाड व झडतीची कारवाई सकाळी ११.३० वाजतापासून सुरु झाली. दुपारी २.३० वाजेपर्यंतझडती घेण्यात आली. यामध्ये दोन चिठ्ठया, शंभर रुपयांचे कोरे स्टॅम्प पेपर व ९ लाख ९७ हजार ४९९ रुपये लोखंडी कपाट व पेटीमध्ये आढळून आले. या कारवाईत प्राप्त झालेल्या दस्तऐवजाची पडताळणी जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार, सहायक निबंधक स्वाती गुडधे यांच्या मागदर्शनात आशिष चर्जन करीत आहे. असे सहकार अधिकारी सुधीर मानकर यांनी सांगीतले.

## पीककर्ज नाकारणाऱ्या बँकांविरुध्द कायदेशीर कारवाई होणार, चंद्रशेखर बावनकुळेंचे निर्देश





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७नागपूर–** ओटीएस अंतर्गत शेतकऱ्यांनी कर्जफेड करुनही ज्या बँकांनी त्यांना पीककर्ज दिले नाही, त्या बँकांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. नियोजन भवन येथे झालेल्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आमदार डॉ. आशिष देशमुख, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मिणा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, प्रभारी जिल्हाधिकारी प्रदीप कुलकर्णी, प्रभारी पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, माजी आमदार सुधीर पारवे, अग्रणी बँक व्यवस्थापक मोहित गेडाम उपस्थित होते.

शेतकऱ्यांवर पीक कर्जाबाबत कुठलाही अन्याय होऊ नये यासाठी प्रत्येक तालुक्याला उपविभागीय दंडाधिकारी, अग्रणी बँक व्यवस्थापक यांनीही वेळोवेळी बँक व्यवस्थापकांना बोलावून रितसर आढावा घ्यावा, असे निर्देशही बावनकुळे यांनी दिले.

### माफसूच्या अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी

अंबाझरी तलावाच्या लगतच जागा माफसूची आहे. अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे अतिक्रमण झाले. कारवाई केल्यानंतर अतिक्रमणधारक न्यायालयात जातात. तेव्हा आपली बाजू भक्कमपणे न मांडल्यामुळे अतिक्रमणधारकांना दिलासा मिळतो. यात जर हलगर्जीपणा झाला असेल तर वरिष्ठ अधिकाऱ्यांसह विद्यापीठातील संबंधित अभियंते, रजिस्ट्रार व जे दोषी असतील त्यांची विभागीय चौकशी लाऊन कारवाई करण्याचे निर्देश पालकमंत्री बावनकुळे यांनी दिले.

### नाल्यांवरील अतिक्रमणे तत्काळ हटवा

महसूल विभागाच्या अंतर्गत असलेल्या नाल्यांवर अतिक्रमण करणाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई करावी. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, स्थानिक महसूल अधिकारी, विकास प्राधिकरण, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी यांनी आपआपल्या भागातील नाल्यांची तपासणी करावी व त्यावरील अतिक्रमणे काढावे, असे निर्देशही महसूलमंत्री बावनकुळे यांनी दिले.

### अवैध गौण खनिज वाहन चालकांवर कठोर कारवाईसाठी लवकरच निर्णय

अवैध गौण खनिजांची वाहतूक करणारे वाहनचालक अनेक वेळा वाहने सरळ महसूली कर्मचाऱ्यांच्या जीवावर बेतेल अशा पध्दतीने अंगावर घालतात. ही वाहने अत्यंत बेदरकारपणे अधिक वेगात चालवितात. याला आळा घालण्यासाठी असलेल्या कलमांव्यतिरिक्त भारतीय दंडसंहिता २०२३ कलम १०९ नुसार गुन्हे दाखल करावीत. गत तीनवर्षात ज्या वाहनांवर अवैध गौण खनिज वाहतूक कारवाई केली आहे अशा वाहनांचे नंबर व यादी तयार करण्याचे निर्देश त्यांनी पोलीस विभागाला दिले.

## ३ लाखांचा ८६ कट्टे मातेरा जप्त, सोयाबीनच्या नावाखाली तुर, चना मातेराची वाहतूक

### अमरावती एपीएमसीच्या गेटवर तपासणी दरम्यान प्रकार उघड

### मापारी व खरेदीदाराला परवाना रद्दची नोटिस



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती –** मरावती बाजार समितीच्या गेटवर बाहेर जाणाऱ्या वाहनांची तपासणी सुरू असताना एका वाहनामध्ये ८६ कट्टे मातेरा आढळून आला. सोयाबिनच्या नावाखाली सदर मातेरा बाजार समितीच्या बाहेर नेल्या जात होता. या मातेराची किमत सुमारे ३ लाख असल्याचे बाजार सामिती प्रशासनाकडून सांगितले जात आहे. या प्रकरणी दोषी आढळलेले खरेदीदार अविनाश लव्हाळे व मापारी स्वप्नील काळे यांचा परवाना रद्द करण्याची नोटिस बजाविण्यात आली आहे.

बाजार समितीच्या गेटवर शुक्रवारी सकाळी धान्य बाहेर घेऊन जाणाऱ्या वाहनांची तपासणी व गेट पासची पाहणी सुरू होती. दरम्यान एमएच ३१एक्स ४८९८ क्रमाकाच्या वाहनातील धान्याची गेटपास तपासले असता यामध्ये ७० पोते सोयाबीन असल्याचा उल्लेख आहे. परंतु प्रत्यक्षात पाहणी केली असता या वाहनामध्ये सोयाबीन ३५ कट्टे, तूर ३७ कट्टे व हरभरा १४ कट्टे असे एकुण ८६ कट्टे मातेरा असल्याचे आढळून आले. बाजार समितीचेनिरिक्षक गेटवर तपासणी करीत असताना वाहना सोबत असलेले बाजार समितीचे मापारी स्वप्नील काळे यांनी तेथून पळ काढला. परंतु हा मातेरा खरेदीदार अविनाश लव्हाळे यांच्या नावे होता. याची माहिती सभापती हरीश मोरे यांना मिळतात यांच्या आदेशावरुन सचिव दिपक विजयकरघटनास्थळी दाखल झाले. त्यामुळे ड्युटीवर असलेल्या कर्मचाऱ्यांनी वाहनासह संपुर्ण मातेरा जप्त केला आहे. याची किमत अंदाजे ३ लाख रुपये असल्याचे बाजार समितीच्या वतीने सांगण्यात आले. या प्रकारणी बाजार समितीने तातडीने कारवाई करीत या मालाचा पंचनामा केला तसेचखरेददार अविनाश लव्हाळे व मापारी स्वप्नील काळेयांना त्यांचा परवाना रद्द करण्याबाबत नोटिस बजाविली आहे. ही कारवाई निरिक्षक राजेश इंगोले, कर्मचारी संदीप दहीकर, प्रशांत बोबडे, अरुन फुले यांनी केली.

### परवाना निलंबित, दुकान जप्तीची नोटिस

या प्रकरणात दोषी आढळलेले मापारी कामगार काळे यांचा परवाना रद्द करण्याची तसेच अविनाश लव्हाळे यांनी मातेरा बाहेर काढत असल्याचे आढळून आल्याने महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ८ नुसार आपली धान्य खरेदीची अनुज्ञाप्ती निलंबीत का करण्यात येऊ नये व सदर अनुज्ञाप्तीवर आपणास अलॉट करण्यात आलेले दुकान क्रमांक ५ जप्त का करण्यात येऊ नये? या बाबत ३ दिवसाचे आत खुलासा सादर करावा, खुलासा समाधानकारक नसल्यास किवा आपण खुलासा सादर न केल्यास आपले काहीही म्हणने नाही असे गृहीत धरुन पुढिल कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी अशी नोटस बजावण्यात आली आहे.

## शेतकऱ्यांच्या कर्जमाफी व हमीभावासाठी लोकविकासचा आक्रोश मोर्चा

### शेकडो शेतकऱ्यांचा सहभाग सरकार विरोधी घोषणांनी परिसर दनाणला




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७चांदुर बाजार**

निवडणुकी दरम्यान राज्यातल्या शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी व हमीभावाचे आश्वासन देऊन सत्तेवर आलेल्या महायुती सरकारने ऐनवेळी आपला शब्द फिरवल्यामुळे राज्यातील शेतकरी आक्रमक झाला व विविध आंदोलने करून शेतकऱ्यांचा निषेध करीत आहे आज चांदूरबाजार तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी एकत्र येऊन लोकविकास संघटनेची संस्थापक अध्यक्ष उपाध्यक्ष नेतृत्वात सरकारच्या विरोधात आक्रोश मोर्चाचे आयोजन करून सरकारी विरोधी घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला यावेळी शेतकऱ्यांनी कर्जमाफीसाठी सरकारकडे लेखी अर्ज करून आम्हाला तात्काळ कर्ज माफी द्यावी अशी विनंती सरकारला केली उद्योगपत्यांचे कोटीचे कर्ज क्षणात माफ करणारे सरकार . शेतकऱ्यांची मात्र कर्ज माफ करायला राज्याच्या आर्थिक बाबीचे कारण समोर करून शेतकऱ्यांची दिशाभूल करीत आहे आज सकाळी दहा वाजता चांदूरबाजार तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी खरेदी विक्रीच्या प्रांगणामध्ये एकत्र येऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हार अर्पण करून मोर्चाला सुरुवात केली हा मोर्चा तहसील कार्यालयावर नेऊन माननीय मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन कर्जमाफीसाठी विनंती केली यावेळी या मोर्चा लोकविकास संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल भालेराव यांच्यासह विजय राऊत रमण लंगोटे श्रेयस बर्वे प्रवीण जामोदकर रवी काशीकर कदीर पठाण नितीन रेखे, गौरव वैद्य उमेश तायडे आकाश खेलदार इमरान सौदागर, निळकंठ चव्हाण सुधाकरराव, ऋषिकेश रडके अथर्व विचे राम हूशगाबादे संतोष नागपुरे यांच्यासोबत शेकडो शेतकऱ्यांनी सहभाग घेऊन या मोर्चामध्ये सहभाग नोंदवला होता .

## वसाड शिवारात वीज कोसळून मजूर महिलेचा मृत्यू





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७धामणगाव रेल्वे**

गेल्या दोन–तीन दिवसांपासून तालुक्यात वादळी वारे व विजेचा कडकडाटसह अवकाळी पावसाने हजेरी लावली. दरम्यान शुक्रवार (ता. १६) सायंकाळी पुन्हा अचानक वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस कोसळला. अशातच वसाड शिवारात कुटुंबासह कांदे वेचण्यासाठी गेलेल्या एका ६० वर्षीय महिलेच्या अंगावर वीज कोसळल्याने ती जागीच ठार झाली. कलेशिया रामदास कवडे असे मृत महिलेचे नाव आहे. याच घटनेत तिचे तीन नातेवाईकसुध्दा जखमी झाले असून त्यांना रूग्णालयात हलविण्यात आले आहे.

शुक्रवारी सकाळी त्या कुटुंबासह कांदे वेचण्यासाठी शेतात गेली होती. सायंकाळी ५ वाजता दरम्यान अचानकविजेचा कडकडाट झालाव पावसाला सुरुवात झाली. बचावण्यासाठी त्या एका झाडाखाली गेल्या अनर्थ झाला. त्या झाडावरच वीज पडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला तर त्यांचे कुटुंबातील अन्य तिघे जण गंभीर जखमी झाल्याचे समजते. त्यांना स्थानिक धामणगाव येथे सामान्य रुणालयात हलविण्यात आले आहे.

## महाराष्ट्रात पुढील आठवड्यातही पावसाच्या सरी बरसणार; लवकरच मान्सूनचे आगमन होणार




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७ अमरावती** :हवेची द्रोणीय स्थिती निर्माण झाल्याने देशभरातील अनेक राज्यांमध्ये पुढील ४ ते ५ दिवस अवकाळी पाऊस होणार आहे. राज्यातदेखील पुढील आठवडाभर पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला असून, दि. २१ व २२ मे रोजी कोकण गोवा, मध्य महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान, या अंदाजामुळे केरळ, तसेच महाराष्ट्रातदेखील मान्सूनचे आगमन लवकर होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.उत्तर प्रदेश, हरियाणा, आसाम, बंगालचा उपसागर, तसेच अरबी समुद्रातदेखील हवेची द्रोणीय स्थिती निर्माण झाली आहे. सर्व भागातून येत असलेले आर्द्रतायुक्त वारे आणि दुपारपर्यंत उन्हामुळे निर्माण झालेले बाष्प याच्या संयोगातून राज्यभर अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. शुक्रवारी मध्य महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, ओरिसा, सिक्किम, आसाम या राज्यात मुसळधार पाऊस झाला, तर पश्चिम किनापट्टी, केरळ, तामिळनाडू, पाँडिचेरी, पश्चिम बंगाल, छत्तीसगढ, झारखंड, बिहार, मध्य प्रदेश, दिल्ली,पंजाब, हरियाणा,पूर्वोत्तर राज्यात विजांच्या कडकडाटासह तुरळक पाऊस नोंदविण्यात आला.दरम्यान, राज्यात पुढील आठवड्यातदेखील पाऊस राहणार आहे. त्यात ही २०, २१ व २२ मे रोजी तळ कोकण, गोवा, दक्षिण मध्य महाराष्ट्रात मुसळधात पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. दि. ३१ मे पर्यंत म्हणजेच मान्सून केरळात दाखल होईपर्यंत, मुंबईसह कोकण व संपूर्ण महाराष्ट्रात मान्सूनपूर्व पावसाची शक्यता आहे.

# शिक्षकाबरोबरच विद्यार्थ्यांचेही समायोजन

## राज्यातील पहिल्याच प्रयोगाची अकोल्यात तयारी!



**सुधीर केने**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती –**

शालेय शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या नव्या संच मान्यतेच्या निकषानुसार अनेक शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत, काही शाळांवर शून्य शिक्षक असल्यामुळे विद्यार्थ्यांची शाळा सुरू झाल्याबरोबर हेळसांड होऊ नये म्हणून शिक्षकांबरोबरच विद्यार्थ्यांच्याही समायोजनाची तयारी अकोल्याच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. सुचिता पाटेकर यांनी चालविली आहे.राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने २०२४ २५ या वर्षाची संचमान्यता जारी केली. या संचमान्यतेत अनेक निकष बदलविण्यात आले आहे. नव्या संच मान्यतेच्या निकषानुसार अनेक ठिकाणी शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत तर अनेक शाळांवर शिक्षकच राहणार नाही. ज्या ठिकाणी शिक्षकच नाही तेथे विद्यार्थ्यांना कोण शिकवणार म्हणून विद्यार्थ्यांचेही समायोजनाची तयारी शाळा सुरू होण्यापूर्वी व्हावि या उदात्त हेतूने डॉ. सुचिता पाटेकर यांनी १३ मे २०२५ रोजी अकोला जिल्ह्यातील संस्थाचालक व मुख्याध्यापक यांच्या नावे एक पत्र जारी केले आहे.नव्या संचे मान्यतेमुळे ज्या शाळेतील शिक्षक अतिरिक्त ठरत आहे त्या शिक्षकांचे समायोजन प्रस्तावित आहे तसेच ज्या शाळेमध्ये शिक्षक संवर्गाचे शून्य पद मंजूर झालेले आहे तेथे विद्यार्थ्यांचे काय असा प्रश्न उपस्थित करून विद्यार्थ्यांची समायोजन प्रस्तावित असल्याचे त्यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे .त्यामुळे अतिरिक्त शिक्षक व विद्यार्थ्यांच्या माहिती त्यांनी मागवली आहे याबाबत आज १५ मे रोजी शिक्षणाधिकारी कार्यालयात सुनावणी घेण्यात आली .या सुनावणीमध्ये ज्या शाळेत शिक्षक संवर्ग शून्य आहे त्या शाळेपासून परिसरातील एक किलोमीटर, तीन किलोमीटर व पाच किलोमीटर लगतच्या शाळेच्या याद्या सुद्धा मागविण्यात आले आहेत. जेणेकरून विद्यार्थ्यांचे समायोजन लगतच्या शाळेत करणे सोयीचे होईल.नवीन संच मान्यता सदोष असल्याने राज्यभर या संच मान्यते विरोधात शिक्षक संघटनांनी रान पेटवले आहे. अनेक संघटना याबाबत न्यायालयात सुद्धा गेलेले आहेत .अशा परिस्थितीत ऐनवेळी शासनाने आदेश मागे न घेतल्यास व नव्या संच मान्यतेनुसार आदेश दिल्यास ज्या शाळा शिक्षकाविना राहतील अशा शाळेतील विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून आपली तयारी पूर्ण असावी या हेतूने अकोल्याच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. सुचिता पाटेकर यांनी आपले काम सुरू केले आहे.आपल्या कर्तव्य शैलीमुळे शिक्षण विभागासह इतर अनेक पुरस्कार प्राप्त असलेल्या डॉ. सुचिता पाटेकर या कर्तव्यदक्ष शिक्षण अधिकारी समजल्या जातात .यवतमाळ येथे प्राथमिक शिक्षणाधिकारी असतानाही त्यांनी अशाच प्रकारचे धाडसी निर्णय घेतले होते. आताही ऐनवेळी समस्या उद्भवू नये म्हणून पूर्वतयारी त्यांनी करून ठेवली आहे. राज्यातील इतर जिल्ह्यात मात्र अशा प्रकारची कुठलीच तयारी झालेली दिसत नसल्याने डॉ. सुचिता पाटेकर यांचा हा राज्यातील पहिलाच प्रयोग आहे.

### त्या विद्यार्थ्यांचे काय?



नव्या संचमान्यतेनुसार अनेक शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन होईल यात तीळ मात्र शंका नाही. मात्र ज्या शाळांवर शून्य शिक्षक आहेत म्हणजेच शिक्षकाविना शाळा राहतील तेथील विद्यार्थ्यांचे भविष्य काय त्यामुळे शासनाने नव्या संच मान्यतेचे आदेश पारित केल्यास ऐनवेळी विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून विद्यार्थी समायोजनाबाबत पूर्वतयारी सुरू केली आहे .त्याबाबत मुख्याध्यापकांची सुनावणी घेण्यात येऊन सर्व माहिती अध्यायावत केली आहे.– **डॉ. सुचिता पाटेकर, माध्यमिक शिक्षणाधिकारी अकोला.**

# यवतमाळात दोन हजारांची लाच

## सहाय्यक मोटर वाहन निरीक्षकासह तिघे जाळ्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७यवतमाळ–**

शिकाऊ व कायम वाहन परवाना देण्याकरिता अधिकृत शासकीय चलानाच्या व्यतिरिक्त दोनशे रुपये प्रमाणे दहा क्लासेसकडून दोन हजार रुपये लाचेची मागणी करणारे तीन सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात अडकले. तसेच एका खासगी दलालास लाच स्वीकारताना अटक केली. ही कारवाई आज शुक्रवारी पुसद येथे आरटीओ कॅम्प दरम्यान करण्यात आली.

सुरज गोपाल बाहीते (३२), मयुर सुधाकर मेहकरे (३०), बिभिषण शिवाजी जाधव (३०) अशी लाचखोर सहाय्यक मोटार वाहन निरीक्षकांची नावे आहेत. यवतमाळ येथील उपप्रादेशिक परीवहन कार्यालय ते कार्यरत आहे. तर बलदेव नारायण राठोड (२९) रा. गव्हा, ता. मानोरा, जि. वाशिम असे लाच स्विकारणाऱ्या खासगी




दलालाचे नाव आहे.सरकार मान्य ड्रायव्हींग स्कुलच्या एका महिला संचालिकेने ७ मे रोजी आरटीओ कॅम्प दरम्यान आरटीओ अधिकारी लाचेची मागणी करतात, अशी लेखी तक्रार यवतमाळ येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला दिली होती. या तक्रारीवरुन शुक्रवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पुसद येथे आरटीओ कॅम्प दरम्यान सापळा रचला. तसेच पंचासमक्ष पडताळणी केली असता सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक बाहीते, मेहकरे आणि जाधव यांनी तक्रारदार यांना त्यांच्या प्रशिक्षणार्थ्यांना शिकावू व कायम पक्का परवाना देण्याकरीता खासगी दलालाच्या माध्यमातुन अधिकृत शासकीय चलना व्यतिरिक्त प्रत्येक अर्जामागे २०० रुपये अतिरिक्त लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.

दरम्यान, शुक्रवारी सापळा कारवाईत एकुण १० शिकवणी क्लासेस करीता २०० रुपये प्रमाणे दोन हजारांची लाच खाजगी एजंट बलदेव राठोड यांच्यामार्फत तक्रारदाराकडून स्विकारली. याप्रकरणी वसंतनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे. ही कार्यवाही अमरावती परिक्षेत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक मारूती जगताप, अपर पोलीस अधीक्षक सचींद्र शिंदे, यवतमाळचे पोलीस उपअधीक्षक उत्तम नामवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अर्जुन घनवट, पोलीस निरीक्षक मनोज ओरके आणि पोलीस अंमलदार अतुल मते, अब्दुल वसीम, सुधीर कांबळे, सचीन भोयर, राकेश सावसाकडे, सुरज मेश्राम, सरिता राठोड व चालक अतुल नागमोते यांनी केली.

# अकोल्याच्या आदिवासी भागात वैद्यकीय महाविद्यालयाची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अकोला–**





जिल्ह्याचे प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोल्याच्या आदिवासी भागात सुरू करण्याची मागणी होत आहे. त्यामुळे आदिवासी भागातील आरोग्यसेवेचे बळकटीकरण व विकासाचे नवून दालन आदिवासी भागात उघडेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते.

चौंडी येथील राज्य मंत्रिमंडळ बैठकीत अहिल्यानगर जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. जिल्ह्याची भौगोलिक, सामाजिक स्थिती व उपलब्ध वैद्यकीय सुविधा लक्षात घेता हे महाविद्यालय आदिवासी अकोले तालुक्यात होणे योग्य ठरेल. त्यामुळे शेजारच्या जुन्नर, इगतपुरी तालुक्यातील आदिवासी भागालाही त्याचा फायदा होईल.

जिल्हा राज्यात प्रगत समजला जातो, तरीही जिल्ह्याच्या आदिवासी भागात आरोग्य सेवेची हेळसांड आहे. मोठी रुग्णालये, मुख्यतः शिर्डी ते अहिल्यानगर पट्ट्यात आहेत. एका टोकाला असलेल्या आदिवासी भागातील गंभीर रुग्णाला ७०–८० किमीवर नाशिक अथवा लोणीला जावे लागते. त्यासाठी खर्च येतो शिवाय वेळेत उपचार मिळत नाहीत.तालुक्याच्या पाण्यावर समृद्ध झालेली अनेक वैद्यकीय महाविद्यालये आहेत.

मात्र आदिवासी तालुक्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता नजीकच्या काळात आदिवासी भागात खासगी वैद्यकीय महाविद्यालय येण्याची सुतराम शक्यता नाही. अन्यथा अत्याधुनिक सुविधा आदिवासी भागाला मिळण्यासाठी प्रतीक्षाच करावी लागेल. अकोल्यात सरकारी जागा, मुबलक पाणी उपलब्ध आहे. समृद्धी मार्ग, पुणे–नाशिक महामार्ग सीमेलगत आहेत. आदिवासी भागामुळे केंद्र शासनाच्या योजनांमधून आर्थिक मदत उपलब्ध होऊ शकेल.


विविध धरणे, वीजप्रकल्प, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन यासाठी तालुक्यातील शेतकऱ्यांनी वेळोवेळी जमीन दिली. त्यातून अंशतः उतराई होण्यासाठी व आदिवासी भागाची आरोग्यविषयक गरज भागवण्यासाठी जिल्ह्याने वैद्यकीय महाविद्यालय अकोल्याला देण्याची मागणी आहे.

# लोणारमध्ये रंगला वार्षिक सूर्य किरणोत्सव!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७बुलढाणा :–** खाऱ्या पाण्याच्या सरोवरामुळे जगविख्यात असलेल्या लोणार नगरीचा पुराण काळातील पौराणिक ग्रंथात देखील उल्लेख आहे.अयोध्येचे युवराज श्रीरामचंद्र, त्यांच्या अर्धांगिनी सीतामाई आणि बंधू लक्ष्मण यांनी आपल्या वनवास काळात लोणार सरोवर परिसरात वास्तव्य केल्याचा उल्लेख आहे. अंतराळातून विशाल उल्का या भूमीत कोसळल्याने या सरोवरची निर्मिती झाली.

या सरोवर परिसरात सीता न्हाणी आहे. अनेक पुरातन मंदिर देखील या नगरीत आहेत. असा पौराणिक वारसा लाभलेल्या लोणार शहरात शुक्रवारी १६ मे रोजी किराणोत्सव रंगला! हा उत्सव मानवी वा 'इव्हेंट'नसून तो नैसर्गिक उत्सव आहे.त्याला पुरातन भारतीय स्थापत्य शास्त्र,खगोल शास्त्र याचा मिलाफ देखील म्हणता येईल.येथील



पुरातन दैत्यसूदन मंदिरात दरवर्षी मे महिन्यात केवळ आणि केवळ पाच दिवस हा सूर्य किरणांचा अद्भुत खेळ रंगतो . यावेळी श्री चरणी शहस्त्र सूर्य किरणे प्रकाश रुपी अभिषेक करतात . यामुळे किरणोत्सव याची देही याची डोळा पाहण्यासाठी दूरवरचे पर्यटक आणि भाविक सरोवर नगरीत डेरे दाखल होतात.

शुक्रवार, १६ मे पासून या किरणोत्सवाला प्रारंभ झाला. येत्या २० मे पर्यंत हा सूर किरणांचा आणि श्री चरणी तेजोमय अभिषेकाचा खेळ रंगणार आहे. शुक्रवारी सकाळी ११ ते ११. ४५ वाजेदरम्यान असा तब्बल पाऊण तास श्रींच्या चरणी सूर्य अभिषेक होत असतानाचे मनोहरी दृश्य शेकडो भाविकानी पाहिले, मोबाईल च्या कॅमेऱ्यात साठवले!यावेळी लोणार सह दूरवरच्या शेकडो भाविक, पर्यटक आणि अभ्यासकांची गर्दी होती.पुरातत्व विभागाने उत्तम व्यवस्था केली होती.तसेच पिण्याच्या पाण्याची सुध्दा व्यवस्था करण्यात आली होती. पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांची खामगाव तहसील कार्यालयाला भेट


## १०० दिवस कृती आराखड्यांतर्गत कार्यालयीन सुधारणा, कार्याचा आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७खामगाव –**

अमरावती विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी खामगाव उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसील कार्यालय येथे १०० दिवस कृती आराखड्यांतर्गत शुक्रवारी १६ मे रोजी क्षेत्रीय भेट दिली. या वेळी त्यांनी कार्यालयाची पाहणी केली.

भेटीदरम्यान त्यांनी कार्यालयीन सुधारणा, नागरिक सेवा सुविधा व प्रशासकीय व्यवस्थेचा प्रत्यक्ष आढावा घेतला.

मुख्यमंत्री यांच्या १०० दिवस ७ कलमी कृती आराखड्यांतर्गत करण्यात आलेल्या सुधारणा, त्यामध्ये सुसज्ज अभ्यागत कक्ष, वाचनालय, नागरिकांसाठी सुलभ सेवा सुविधा, कार्यालयाचे सौंदर्यीकरण व





डिजिटल प्रणालींचा वापर याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. या वेळी विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली खामगाव उपविभागातील दोन्ही कार्यालयांनी अत्यंत उत्कृष्ट कामगिरी केली आहे, ही बाब कौतुकास पात्र आहे. असे नमूद केले. दरम्यान, तहसीलदार सुनील पाटील यांनी भविष्यात देखील या कार्यपद्धतीचा आलेख सातत्याने उंचावत राहील, अशी ग्वाही विभागीय आयुक्त यांना दिली. या वेळी शेगाव तहसीलदार दीपक बाजड, निवासी नायब तहसीलदार सोनाली भाजीभाकरे, नायब तहसीलदार विजय पाटील, नायब तहसीलदार निखिल पाटील, पुरवठा निरीक्षक बावणे यांच्यासह उपविभागीय व तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# केंद्र शासन २३ सप्टेंबर हा दिवस आयुर्वेद दिवस म्हणून देशभर साजरा करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७ अमरावती –** योग या विद्येस प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे प्रयत्न सूरू झाल्यानंतर आयुर्वेद हे प्राचीन शास्त्र पुढे यावे म्हणून केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. २०१४ मध्ये सत्तेवर येतात मोदी सरकारने स्वतंत्र आयुष मंत्रालय स्थापन केले. या मंत्रालयामार्फत विविध उपक्रम सूरू असतानाच दिन विशेष म्हणून आयुर्वेदचे स्थान आता अधोरेखित करण्यात आले आहे.

केंद्र शासनाने २३ सप्टेंबर हा दिवस आयुर्वेद दिवस म्हणून देशभर साजरा केला जाणार असे जाहीर केले. पूर्वी दिवाळीत धनतेरसला आयुर्वेद दिन निश्चित करण्यात आला होता. पण ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर या महिन्यात तो कधीतरी साजरा होई. वार्षिक तारीख निश्चित नव्हती. आयुष मंत्रालयाने असे नमूद केले की, येत्या दशकात धनतेरसची तारीख बदलत राहील. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिवस आयोजित करण्यास अडचणी येतील. ही विसंगती दूर करण्यासाठी जागतिक उत्सवासाठी बदल आवश्यक ठरतो. म्हणून आयुष मंत्रालयाने योग्य पर्याय निवडण्यासाठी समिती स्थापन केली. समितीने चार तारखा सुचविल्या. त्यात २३ सप्टेंबर या दिवसास पसंती मिळाली. ही तारीख शरद ऋतुतील विषववृत्ताशी जुळते. दिवस व रात्र जवळपास समान



असतात. ही खगोलीय घटना निसर्गातील संतुलनाचे प्रतीक ठरते. मन, शरीर व आत्मा यातील समतोल राखण्यावर भर देणाऱ्या आयुर्वेदिक तत्वज्ञानाशी पूर्ण जुळते.


आयुर्वेदास प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि निरोगीपणात महत्वाची भूमिका बजावणारी वैज्ञानिक, पुराव्यावर आधारित समग्र औषध प्रणाली म्हणून प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी आयुर्वेद दिन साजरा होणार. जागतिक स्तरावर आयुर्वेद दिन साजरा करण्याची व त्याचे पालन करण्याची वृत्ती वाढावी म्हणून २३ सप्टेंबर ही तारीख निश्चित करण्यात आली असल्याचे, आयुष मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. नागरिक, आरोग्य व्यावसायी, शैक्षणिक संस्था, आंतरराष्ट्रीय संस्था यांनी निसर्गासोबत संतुलन राखत जीवन जगण्याचे तत्व हाच आयुर्वेद शास्त्राचा सार आहे. २३ सप्टेंबर याच दिवशी आयुर्वेद दिन सोहळ्यात सक्रियपणे सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ही तारीख निश्चित करण्यात आल्याने दरवर्षी दिवाळीत वेगवेगळ्या तारखेस साजरा केल्या जाणारा आयुर्वेद दिनाचा घोळ यामुळे संपुष्टात येणार, अशी भावना आयुर्वेद क्षेत्रातील तज्ञ व्यक्त करतात.

# प्राण्यांपासून पीक संरक्षण; कुंपण योजना राबवा : सह्याद्रीवरील बैठकीत वरुडच्या आमदारांनी वनमंत्र्यांकडे केली मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि,१७अमरावती**

वरुडचे आ. उमेश यावलकर यांनी वन्य प्राण्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत असल्यामुळे पिकांच्या सुरक्षेसाठी कुंपण योजना राबवण्यात यावी, अशी मागणी वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे केल्यानंतर वनमंत्र्यांनी तार कुंपण योजना राबविण्या संदर्भात अधिकाऱ्यांना आदेश दिले.



वरूड- मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांना वन्य प्राण्यांपासून होणाऱ्या त्रासासंदर्भात बुधवारी १४ मे रोजी मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहावर वनमंत्री गणेश नाईक व आ. उमेश उर्फ चंदू यावलकर यांच्यात बैठक झाली. या बैठकीला वनविभागाचे अप्पर मुख्य सचिव, प्रभाग मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) नागपूर, मुख्य वनसंरक्षक अमरावती यांची उपस्थिती होती. गेल्या काही वर्षांपासून मध्यप्रदेश सीमेलगत, सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असणाऱ्या वरूड व मोर्शी येथील शेतकऱ्यांना वन्यप्राण्यांमुळे मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. यामध्ये वन्यजीवांकडून शेतकऱ्यांच्या शेतातील तोंडावर आलेल्या उभ्या पिकांची नासाडी होत आहे. तर कधी शेतकऱ्यांना आपल्या पिकांच्या स्वरक्षणासाठी वाघ, बिबट, अस्वल, निलगाय, रानडुक्कर या सारख्या हिंसक वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात प्राण गमवावे लागत आहेत. यामुळे हिंसक प्राण्यांच्या भितीपोटी इतर शेतकऱ्यांना जीव मुठीत धरून ओलित करावे लागत आहे. तर कधी शेतातील पाळीव प्राण्यांची शिकार होत असल्याने शेतीला पूरक व्यवसायावर अवलंबून शेतकरी कुटुंबावर संकट उभे ठाकले आहे. या गोष्टी लक्षात घेता शेतकऱ्यांचा व शेतीपिकांच्या सुरक्षेचा मुद्दा चव्हाट्यावर आला. यावर उपाययोजना करण्याबाबत आ. यावलकर यांनी वनमंत्र्यांकडे मागणी केली. वनमंत्र्यांनी सर्व बाबी लक्षात घेत उपाययोजनेबाबत आ.यावलकर यांच्याशी सकारात्मक चर्चा केली. जंगलातील पाणवठ्यांमध्ये पाणी भरले जात नसल्याने वन्य प्राण्यांचा शहरी व ग्रामीण भागत संचार वाढतो आहे. याच बरोबर जंगलात वन्य प्राण्यांना पुरेसे अन्न, चारा व पाणी मिळण्यासंदर्भात ठोस उपाययोजना राबवाव्यात, वन्य जीवव्यवस्थापन व स्थलांतरण, तार कुंपण एक प्रभावी उपाय म्हणून कुंपण पुरेसे उंच व मजबूत असावे जेणेकरून जंगली प्राणी ते ओलांडू व तोडू शकणार नाहीत. शेतकऱ्याच्या शेतमालाचे नुकसान होणार नाही. दोन्ही तालुक्यात वन्यप्राण्याचा संचार वाढल्याने अतिरिक्त बचाव पथक (रेस्क्युटिम) वाढवण्यात याव्यात, अशी मागणी केली. त्यानंतर वनमंत्र्यांनी या संदर्भात अधिकाऱ्यांना सूचना केल्या. फेन्सींग योजने अंतर्गत ८ फुट उंचीच्या लोखंडी पोलसह मजबूत तारेचे कंपाऊंड बसवण्यात यावे, असे निर्देश दिले.

# सुरत पॅसेंजर शुक्रवारी १६ रोजी स. ९.०५ ऐवजी दु. १ वाजता ४ तास उशिरा

## प्रवाशांची गैरसोय नाहक मन:स्ताप सहन करावा लागला

**विदर्भ प्रजासत्ताक दि,१७अमरावती**



अंमळनेर येथे मालगाडीचे ७ डबे गुरुवार १५ रोजी रुळावरून घसरल्याने गुजरातकडून येणाऱ्या गाड्यांना उशीर झाला. त्यात सुरत पॅसेंजरचाही समावेश होता. सुरत पॅसेंजर अमरावती मॉडेल रेल्वे स्थानकावर रात्री ९.५५ वाजता पोहोचते. त्यानंतर स. ९.०५ वा. प्रवाशांना घेऊन निघते. परंतु. गुरुवारी रात्री सुरत पॅसेंजर आलीच नाही. ती शुक्रवारी दुपारी १२ दरम्यान मॉडेल रेल्वे स्थानकावर पोहोचली. त्यामुळे सुरतला जाण्यासाठी आरक्षण करणारे, इतर प्रवाशांची स. ८ ते ९ दरम्यान रेल्वे स्थानकावर गर्दी झाली होती. सुरत पॅसेंजर स. ९ ऐवजी दु. १ वा. निघेल, अशी घोषणा झाल्यानंतर प्रवाशांमध्ये गोंधळ उडाला. कारण, काहींना कामाने सुरत एक्सप्रेसने मुर्तिजापूर, अकोला, शेगाव, भुसावळ, सुरत येथे जायचे होते. ऐनवेळी अनेकांना त्यांचा बेत रद्द करावा लागला. या कालावधीत इतर कोणत्या रेल्वे गाड्या आहेत. काय, याचाही शोध सुरू झाला. काहींनी बडनेरा स्थानकाकडे धाव घेतली. ज्यांचे सुरत एक्सप्रेसचे आरक्षण होते, त्यांचा नाईलाज होता. परंतु, सामान्य तिकिटावर ज्यांना प्रवास करायचा होता, त्यांनी प्रवासाचे इतर पर्याय निवडले.

बडनेरा-नाशिक रोड मेमूमध्ये वाढली प्रवाशांची तुफान गर्दी सुरत एक्सप्रेस ४ तास उशिरा धावणार असल्याने अनेकांनी बडनेरा-नाशिक रोड मेमूचा पर्याय निवडला. बरे बडनेरा-नाशिक रोड असे या मेमूचे नाव असले तरी ती स. ९.१५ वा. सुमारात अमरावती स्थानका वरूनच सुटते. याबाबत अनेक प्रवाशांना काहीच माहिती नाही. अमरावती स्थानकावरून ही मेमू सुटल्यानंतर अर्धा तासात बडनेरा येथे पोहोचते व तेथून स. १०.०५ वाजता निघते. ऐवी या मेमूमध्ये गर्दी नसते कारण, बहुतेक प्रवासी हे सुरत पॅसेंजरने निघून जातात. परंतु, आज मेमूमध्येही प्रवाशांची गर्दी झाली होती.

# नऊ मंडळे एकत्रीत येऊन साईनगर परिसरात बुध्दजयंती निमित्त भव्य शांतता रॅली संपन्न

## बुद्धविहार कृती समितीचे मुख्य संयोजक देवा शेंडे यांचे उत्कृष्ट नियोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ अमरावती**

स्थानिक साईनगर परिसरात बुद्धजयंतीच्या मंगल पर्वावर सामुहीक अशी विराट धम्मरॅली संपन्न झाली. जगाला युद्धाची न्हवे तर बुद्धाची गरज आहे तसेच बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे असा संदेश रॅलीतून देण्यात आला.





साईनगर परिसर बुध्दविहार कृती समितीच्या नेतृत्वात एकूण नऊ संघटना एकत्र येऊन सदर रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामधे विश्वशांती बुध्दीष्ठ मंडळ आकोली, भीमज्योत सांस्कृतिक क्रीडा मंडळ, नालंदा बुद्ध विहार पूर्वा कॉलनी, संत कबीरा मानवता समिती म्हाडा कॉलनी १, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैत्रीय संघ म्हाडा कॉलनी २, संबोधी बुध्द विहार फॉरेस्ट कॉलनी, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले महिला मंडळ साने गुरुजी नगर, यशसिद्धी महार महार रेजिमेंट व सम्राट अशोक बुध्द विहार कोंडेश्वर रोड आदी बुद्धिष्ट संघटनांचा त्यात अंतर्भाव होता.

म्हाडा कॉलनीतून प्रारंभ झालेली ही विराट धम्मरॅली अकोलीमार्गे साईनगरच्या मुख्य रस्त्यांवरून चालत जाऊन त्याचा समारोप भीमज्योत कॉलनी येथे झाला, याप्रसंगी भंते अनोमदर्शी यांनी उपस्थित जनसमूहाला त्रिशरण-पंचशील व धम्मदेशना दिली. बुध्दजयंतीच्या मंगलपर्वावर आमदार रविभाऊ राणा यांच्या निधीतून व श्री. सचिनभाऊ भेंडे यांचे प्रयत्नाने ४० लक्ष रुपयांच्या विकासकामाचे भूमिपूजन यावेळी करण्यात आले. धम्मरॅली करिता सर्व जातीधर्माच्या बांधवांनी तनमनधनाने सहकार्य करून सामाजिक सलोख्याचा एक नवा संदेश समाजाला दिला. स्नेहभोजनाने या विराट धम्मरॅलीची सांगता झाली.

सर्व बुद्धिष्ट संघटनांच्या समन्वयातून संपन्न झालेल्या या विराट व ऐतिहासिक अशा 'शांतता एकता रॅलीला यशस्वी केल्याबद्दल, बुद्धविहार कृती समितीचे मुख्य संयोजक देवा शेंडे यांच्या नेतृत्वात पार पडली यावेळी सर्व समाजबांधवांचे व रॅलीला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे सविनय आभार मानले आहेत.

# उगवण क्षमता तपासूनच बियाण्यांची लागवड करा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

खरीप हंगाम लवकरच सुरू होणार आहे. हंगामपूर्व कामकाजाची लगबग शेतकऱ्यांत दिसून येत आहे. कृषी विभागाच्या वतीने बियाणे उगवण क्षमता चाचणी व बीजप्रक्रिया प्रात्यक्षिक कार्यक्रमाला सुरुवात झाली आहे.



कृषीविषयक योजनांची माहिती आणि जनजागृती करून शेतीसाठी उपयुक्त असलेल्या कृषी मोहिमांचीमाहिती देत शेतकऱ्यांशी संवाद साधला जात आहे. यंदाच्या हंगामात नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी बियाण्यांची उगवण क्षमता तपासूनच लागवड करावी, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

# अखेर २० वर्षाचा संघर्ष संपला : जिल्हा न्यायालयाने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रविण मोहोड व इतरांना केले निर्दोष

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

२००६ मध्ये अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सुरू असलेले १२ तासाचे वीज भारनियमन कमी करा, भारनियमन च्या वेळा निश्चित करा,भारनियमना व्यतिरिक्त वीज पुरवठा खंडित होणार नाही याची खबरदारी घ्या,शेतकऱ्यांना ओलितासाठी दिवसा वीज पुरवठा द्या या मागण्यासाठी विद्युत भवन येथे २००६ मध्ये अमरावती येथे कुऱ्हाड आंदोलन झाले होते.



विद्युत महामंडळाचे उपकार्यकरी अभियंता मापारी यांच्या तक्रारी वरून आम्हाला गाडगे नगर पोलीस ठाण्यात अटक करून पोलिसांनी खोटया आरोपावर आधारीत आरोपी केले होते , व गंभीर स्वरूपाचे ३५३, ५०६, २९४, ३२६, ३४, १८६,भारतीय दंड सहिता,सारखे गुन्हे दाखल केले होते, सुमारे २० वर्षांपासून शेतकरी, शेतमजूर आंदोलक म्हणून न्यायालयाच्या पायऱ्या चढाव्या लागल्या, मात्र माननीय न्यायालयाने आम्हाला जनतेसाठी केलेल्या लढाई तुन निर्दोष मुक्त केले, त्याबद्दल न्यायालयाने दिलेला निर्णय स्वीकार करून न्यायालयाचेआभार व्यक्त केले.

# अमूल्य सोने गेले कपाटात.. बेंटेक्स मिरवतोय दिमाखात; कपड्यांनुसार फॅन्सी, इमिटेशन ज्वेलरींची महिला युवतींना भुरळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

सोन्याने एक लाखाचा टप्पा गाठल्यापासून हा अमूल्य दागिना अंगावर घालून मिरवण्यापेक्षा कपाटात, लॉकरमध्ये सुरक्षित ठेवण्यावर महिलांचा भर आहे. त्यामुळे सोने गेले कपाटात आणि बॅटेक्स मिरवतोय दिमाखात, अशी सध्याची स्थिती आहे. अगदी पारंपरिकपासून ते फॅशनेबल कपड्यापर्यंत स्टाइल कोणतीही असो, त्यावर शोभून दिसतील, असे दागिने बाजारात असल्याने महिला व युवतींना या ज्वेलरीची भुरळ पडली आहे.जगभर भारतीय महिलांचे सोनेप्रेम सर्वश्रुत आहे. भारतात सणवार, वाढदिवस यानिमित्ताने सोने खरेदी मोठ्या प्रमाणात होते; पण या वर्षात सोन्याने १ लाखाचा टप्पा गाठल्याने हा अमूल्य दागिना आता सर्वसामान्यांच्याआवाक्यात राहिलेला नाही. परगावी, लग्न समारंभांना घेऊन गेलो की त्यांची सुरक्षितता हा मोठा प्रश्न तयार होतो. त्यामुळे सोन्याचे दागिने महिलांच्या अंगावर कमी आणि कपाटात, लॉकरमध्ये जास्त काळ राहतात. त्या दागिन्याला पर्याय म्हणून बॅटेक्सच्या, ब्रँडेड खडे, फॉर्मिंगच्या दागिन्यांना अधिक मागणी आहे. त्यामुळे व्यावसायिकही मागणीनुसार आपले दुकान सजवित आहे.



## १०० रु.च्या दागिन्यांनी खाल्ले मार्केट

बाजारातील १०० रुपयांच्या दागिन्यांनी बॅटेक्सचे मार्केट खाऊन टाकले आहे. बैटेक्सचे दागिने टिकाऊ असल्याने त्यांचे दरही थोडे जास्त असतात. तुलनेत १०० रुपयांचे यूज अँड थ्रो दागिने परवडत असल्याने महिलांची या दागिन्यांना अधिक पसंती आहे.

# 'संवाद' उपक्रमातून महिनाभरात ३७५ समस्यांची नोंद : २५९ प्रकरणी समाधानकारक निराकरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

जिल्हाधिकारी कार्यालयाने सुरू केलेला 'संवाद' हा उपक्रम लोकाभिमुख प्रशासनाच्या दिशेने उचललेले एक महत्वाचे पाऊल ठरत आहे. महिनाभरात ३७५ समस्यांची नोंद झाली असून यातून २५९ प्रकरणी समाधानकारक कार्यवाही करण्यात आली आहे.जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा पथदर्शी प्रकल्प आहे. अभ्यागतांचे व्यवस्थापन, नागरिकांच्या समस्यांची नोंदणी, त्यांचे निराकरण आणि योग्य मार्गदर्शन यासाठी कार्यालयात 'सिंगल पॉइंट ऑफ कॉन्टॅक्ट' उपलब्ध करून देण्यात आला आहे. या उपक्रमाचे उद्घाटन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते १० एप्रिल रोजी करण्यात आले. १०० दिवसांच्या कृती आराखडा अंतर्गत याची सुरुवात झाली आहे.या प्रणालीचा लाभ घेऊन मागील एक महिन्याच्या काळात ३७५ समस्या नोंदविल्यानंतर त्यापैकी २५९ प्रकरणांचे समाधानकारक निराकरण करण्यात आले आहे. ११६ प्रकरणात कार्यवाही करण्यात येत आहे. प्रत्येक समस्येनुसार विभागाकडे प्रलंबित तक्रारीबाबत संवाद कक्षामधून पाठपुरावा केला जात आहे. तसेच आजपर्यंत १८१ नागरिकांनी संवाद कक्षास भेट दिली आहे, तर एकुण १४६ नागरिकांनी दुरध्वनी, वॉट्सप, ऑनलाइन पद्धतीने महिती, मार्गदर्शन घेऊन समस्या नोंदविल्या आहेत.संवाद कक्षामध्ये मार्गदर्शन व मदत करणे, समस्या नोंदविणे व प्रणाली हातळण्यासाठी एक नायब तहसिलदार, २ अव्वल कारकुन आणि ऑपरेटर्स यांच्या नेमणूक करण्यात आली आहे. प्राप्त व निकाली काढलेल्या समस्याबाबत जिल्हाधिकारी आठवड्यातून दोन वेळा आढावा घेतात. तसेच समस्या दाखल करणाऱ्या




नागरिकांना भेटण्यासाठी वेळ देऊन जिल्हाधिकारी देखील समस्या जाणून समाधान करतात.भौगोलिकदृष्ट्या १२ हजार स्क्वेअर किलोमीटरपेक्षा जास्त क्षेत्रात पसरलेल्या जिल्ह्यातील नागरिकांना, तसेच मेळघाट व धारणीसारख्या दुर्गम भागातील लोकांनाही त्यांच्या समस्या थेट त्यांच्या आहे त्या ठिकाणाहून किंवा घरी बसून मोबाईलवरून नोंदवता येणार आहेत. यामुळे नागरिकांचा वेळ, येण्या-जाण्याच्या खर्च आणि श्रमाची बचत होणार आहे. शासनाच्या सेवा प्रत्येक सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणे हे 'संवाद' प्रणालीचे प्रमुख उद्दिष्ट आहे.या प्रणालीअंतर्गत प्रत्येक तक्रारीसाठी एक विशिष्ट ओळख क्रमांक दिला जातो. यामुळे नागरिकांना त्यांच्या तक्रारीची स्थिती घरबसल्या तपासता येते. या उपक्रमामुळे प्रशासनात अधिक पारदर्शकता येत आहे आणि समस्यांचे वेळेत निराकरण होऊन प्रशासनावरील ताण कमी होण्यास मदत होत आहे.

अर्जुन सावंत यांच्या समस्येचे झाले त्वरीत निराकरण*या उपक्रमाचे एक उत्तम उदाहरण म्हणजे नांदगाव पेठ येथील अर्जुन सावंत हे रोजगारासाठी जम्मू-कश्मीर येथे गेले. तेथे दहशतवादी हल्ल्यामुळे ते तीन आठवड्यांपासून अडकले. दरम्यान त्यांच्याजवळचे पैसेही संपले. त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील मदत कक्षाच्या क्रमांकावर संपर्क साधून मदतीची विनंती केली. याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी त्वरित दखल घेऊन गावी परत येण्यासाठी पाच हजार रुपयांची आर्थिक मदत केली. तसेच त्यांच्या प्रवासाची सोय केली. वेळेवर मदत मिळाल्याने ते सुखरूप आपल्या गावी परतले. अशा अनेक समस्या 'संवाद' प्रणालीमुळे सोडवण्यात आल्या आहेत.संवाद कक्षातील संपर्क क्रमांक ९४०५८०३६३८ आणि संकेतस्थळ hello collector.in तसेच पुढील क्यूआर कोडचा उपयोग करून आपल्या समस्यांचे निराकरण करावे. तसेच कार्यालयाचा संपर्क वेळ सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ पर्यंत आहे. या सुविधेचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी केले आहे.

# पदग्रहण समारंभ ....




भारतीय जनता पार्टीचे नवनिर्वाचित शहर अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी आपल्या पदाचा पदभार स्वीकारला राजापेठ स्थित भाजपा कार्यालयात हा पदग्रहण समारोह पार पडला यावेळी माजी शहर अध्यक्ष प्रवीण पोटे पाटील यांनी हार टाकत धांडे यांचे स्वागत केले यावेळी नवनीत राणा,किरण पातुरकर ,जयंत डेहनकर, शिवराय कुलकर्णी ,बादल कुळकर्णी,सुनील काळे यांच्या शह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# मान्सून लवकर येण्याचे संकेत, पुढील आठवडाभर राज्यात अनेक ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

सर्व भागातून येत असलेले आर्द्रतायुक्त वारे आणि दुपारपर्यंत उन्हामुळे निर्माण झालेले बाष्प याच्या संयोगातून राज्यभर अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. हवेची द्रोणीय स्थिती निर्माण झाल्याने देशभरातील अनेक राज्यांमध्ये पुढील ४ ते ५ दिवस अवकाळी पाऊस होणार आहे.

राज्यातदेखील पुढील आठवडाभर पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला असून, दि. २१ व २२ मे रोजी कोकण




गोवा, मध्य महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

दरम्यान, या अंदाजामुळे केरळ, तसेच महाराष्ट्रातदेखील मान्सूनचे आगमन लवकर होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. उत्तर प्रदेश, हरियाणा, आसाम, बंगालचा उपसागर, तसेच अरबी समुद्रातदेखील हवेची द्रोणीय स्थिती निर्माण झाली आहे.

शुक्रवारी मध्य महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेश, ओरिसा, सिक्किम, आसाम या राज्यात मुसळधार पाऊस झाला, तर पश्चिम किनारपट्टी, केरळ, तामिळनाडू, पाँडिचेरी, पश्चिम बंगाल, छत्तीसगढ, झारखंड, बिहार, मध्यप्रदेश, दिल्ली, पंजाब, हरियाणा, पूर्वोत्तर राज्यात विजांच्या कडकडाटासह तुरळक पाऊस नोंदविण्यात आला.

दरम्यान, राज्यात पुढील आठवड्यात देखील पाऊस राहणार आहे. त्यात ही २०, २१ व २२ मे रोजी तळ कोकण, गोवा, दक्षिण मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. दि. ३१ मे पर्यंत म्हणजेच मान्सून केरळात दाखल होईपर्यंत, मुंबईसह कोकण व संपूर्ण महाराष्ट्रात मान्सूनपूर्व पावसाची शक्यता आहे.

# कापूस बियाण्यांचा काळाबाजार थांबविण्यासाठी सरळ वाण आवश्यक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ नागपूर**

सरकारने जीनोम संपादित तांदळाच्या दोन वाणांना परवानगी दिली आहे. हायब्रिड कापसाची उत्पादकता व उत्पादन घटक असून, खर्च वाढत असल्याने उत्पादन घेणे कठीण झाले आहे. बियाण्यांचे उत्पादन मर्यादित असून, वापर वाढत असल्याने काळाबाजार होत आहे. हा काळाबाजार थांबविण्यासाठी कापसाचे सरळ वाण उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे.



जगात बीटी कापसाचे सरळ वाण वापरले जाते. सन २०१५ पासून भारतीय शेतकऱ्यांना बीटी कापसाचे सरळ वाण उपलब्ध करून देण्याची मागणी केली जात आहे. कृषी निविष्ठांचा वापर व दर वाढले असून, मजुरांची कमतरता व वाढलेल्या मजुरीमुळे उत्पादनखर्च वाढला आहे. उत्पादन व उत्पन्न कमी होत आहे. घन व अतिघन लागवडीमुळे बियाण्यांचा वापर प्रतिएकर दोन पाकिटांवरून तीन ते सहा पाकिटांवर गेला आहे.

देशात बियाण्यांचे उत्पादन मर्यादित असल्याने तुटवडा निर्माण होऊन काळाबाजार होत आहे. प्रतिबंधित एचटीबीटी बियाणे चोरून विकले जात असल्याने तुटवडा लक्षात येत नाही. हायब्रिड बियाण्यांमध्ये बीटी जनुके पूर्ण क्षमतेने सक्रिय होत नसल्याने गुलाबी बोंडअळीचा धोका व नुकसान कायम आहे. या बाबी सरळ वाणामध्ये टाळल्या जात असल्याचे संशोधन व वापरावरून सिद्ध झाले आहे, अशी माहिती विजय जावंधिया यांनी दिली.

# अज्ञातवासात गेलेले माजी नगरसेवक झालेत ॲक्टिव्ह

## भावी नगरसेवकाचे स्वप्न पाहणारे कार्यकर्ते ही लागले कामाला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाल्याने आता भावी नगरसेवकांचा पुन्हा एकदा पालिकेत राबता वाढल्याचे चित्र सध्या दिसत आहे. तब्बल तीन वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर अनेकांच्या हऱ्यावर हास्य फुलले असून, कामांच्या निमित्ताने का होईना परंतु जनतेच्या अन् नेत्यांच्या मनात स्थान भक्कम करण्याचे प्रयत्नही अनेकांनी आता सुरू केले आहेत. महापालिकेतील लोकनियुक्त कार्यकारिणीचा कार्यकाळ एप्रिल २०२२ रोजी संपुष्टात आला. यानंतर पालिकेवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या भावी नगरसेवकांचा पुरता भ्रमनिरास झाला.इतकेच नव्हे तर, नागरिकांशी असलेला त्यांचा संपर्कही तुटला. अनेक माजी व भावी नगरसेवक अज्ञातवासात गेले. गेल्या दोन-तीन वर्षांपासून काहींचे दर्शनही दुर्मिळ झाले. आता मात्र सर्वोच्च न्यायालयाने चार आठवड्यांत निवडणुकीची अधिसूचना काढण्याचे निर्देश दिल्याने पुन्हा एकदा भावी नगरसेवक नव्या दमाने कामाला लागले आहेत. नागरिकांच्या गाठीभेटी घेणे, त्यांच्या अडचणींना धावून जाणे, सामाजिक प्रश्नांची सोडवणूक आदी कामे जोमाने सुरू केल्याने भावी नगरसेवकांची पालिकेत 'उठबस' वाढू लागली आहे.



### बॅनरची संख्या वाढली


सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. दरम्यान, शहरातील काही इच्छुकांनी आता नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. अनेकांनी विविध कारणांसाठी शुभेच्छा बॅनरही लावणे सुरू केले आहे. अज्ञातवासात गेलेले माजी नगरसेवक आता दिसू लागले आहेत.

# नोंदणीसाठी जमिनीचा नकाशा आवश्यक; रजिस्ट्रीचे प्रमाण घटले

## आर्थिक उलाढाल थंडावली : नव्या अध्यादेशाने वाढली अडचण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

शासनाने ४ मे रोजी काढलेल्या शेतजमिनीच्या खरेदीसाठी आता मोजणीचा नकाशा व चर्तुःसीमा कायम करण्याचा नियम लागू केला. त्याची अंमलबजावणी करण्याचे आदेशही दुय्यम निबंधकाला दिल्याने जमिनीच्या नोंदणीला अचानकपणे ब्रेक लागल्याचे चित्र जिल्ह्यात बघायला मिळत आहे.



गहाणखत, हक्कसोड, एनए ले-आउट असलेल्या प्लॉटचे खरेदी खत होऊ लागले. अचानकपणे मोजणीचा नकाशा आवश्यक केल्याने शेतकरी, खरेदीदार यांची धावपळ वाढली. भूमिअभिलेख कार्यालयात शेतकरी गर्दी करू लागले. पण, मोजणीसाठी तीन महिन्यांची वेटिंग असल्याने मोठी पंचायत झाली. परिणामी, आर्थिक उलाढाल थंडावली. लग्नविधी, शैक्षणिक फी, शेतातील कामे, मशागत आणि खरीप हंगामाचे नियोजन कोलमडले. शासनाने सवलत द्यावी, अशी मागणी होत आहे.

बक्षीसपत्र, साठेखताची कामे रखडलीशासनाने नोंदणी अधिनियमातबक्षीसपत्र, साठेखत आदी कामे केलेल्या बदलामुळे शेतजमिनीसह रखडली. परिणामी, खरेदीखताचा टक्का घटला असून, शासनाला मिळणारा महसूलही घटला. शासनाने प्रतिबंधित केलेल्या जमिनीच्या खरेदीखताला नकाशा लागतो.

### बक्षीसपत्र, साठेखताची कामे रखडली

शासनाने नोंदणी अधिनियमात केलेल्या बदलामुळे शेतजमिनीसह बक्षीसपत्र, साठेखत आदी कामे रखडली. परिणामी, खरेदीखताचा टक्का घटला असून, शासनाला मिळणारा महसूलही घटला. शासनाने प्रतिबंधित केलेल्या जमिनीच्या खरेदीखताला नकाशा लागतो.

### नियमांची अंमलबजावणी

महसूल व वन विभागाच्या वतीने नोंदणीसंदर्भात लागू केलेल्या नियमावलीची अंमलबजावणी सर्व दुय्यम निबंधकांना करणे आवश्यक आहे. शासनाने प्रतिबंधित केलेल्या तुकड्याची म्हणजेच १० आर, २० आर क्षेत्राच्या खरेदीखतासाठी मोजणी नकाशा सक्षम अधिकाऱ्याच्या परवानगीचा गरजेचा आहे. पण, त्यापेक्षा अधिक शेतजमिनीची खरेदी करण्यासाठी मोजणी नकाशाची गरज नसल्याचे सांगण्यात आले.

### शासनाच्या परिपत्रकाची अंमलबजावणी

राज्याच्या नोंदणी अधिनियमात करण्यात आलेल्या दुरुस्तीप्रमाणे शासकीय कामकाज केले जात आहे. जे शासनाचे परिपत्रक किंवा नियमावली लागू केली, त्याची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.

# एकता आभूषणच्या तीन दुकानांवर आयकरची धाड; तब्बल ९६ तासानंतरही आयकर विभागाचा तपास सुरूच




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

एकता आभूषण या ज्वेलर्सच्या अमरावती, अकोला व परतवाडा येथील तीन प्रतिष्ठानांवर आयकर विभागाने बुधवारी (दि. १४) धाडसत्र राबविले. या धाडीत नेमकी किती बेहिशेबी मालमत्ता, रोकड व दस्तऐवज जप्त झाले, याचा खुलासा करण्यास आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी तूर्तास नकार दिला. दरम्यान, या धाडसत्रामुळे सराफा व्यावसायिकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. स्थानिक जयस्तंभ चौक मार्गावरील एकता आभूषण या प्रतिष्ठानाचे शटर दुपारपासून खाली ओढण्यात आले. सेल्समन, वुमन्सना मात्र सुटी देण्यातआली आहे. तब्बल ९६ तासानंतरही आयकर विभागाचा तपास सुरूच आहे.

सूत्रांनुसार, मोहित अटलानी यांच्या मालकीची अमरावती, अकोला व परतवाड्यासह यवतमाळ येथे एकता आभूषण ही सोने-चांदीच्या दागिन्यांची प्रतिष्ठाने आहेत. बुधवारी सकाळी आयकरच्या पथकाने अमरावती येथील जयस्तंभ चौक मार्गावरील सहकार भवन शेजारील प्रतिष्ठानासोबतच परतवाडा व अकोला येथील प्रतिष्ठानांवर छापे टाकले. त्यासाठी प्रत्येकी सहा अधिकाऱ्यांचा समावेश असलेली तीन स्वतंत्र पथके तयार करण्यात आली होती. तीनही पथकांनी एकाच वेळी हे छापे टाकले. नागपूर व नाशिक येथील हे पथक असल्याचे समजते. या कारवाईत त्यांनी स्थानिक अधिकारी व कर्मचाऱ्यांनाही सामील करून घेतल्याचे सांगण्यात येत आहे. आयकर विभागाचे साहाय्यक आयुक्त सतीश गावंडे व निरीक्षक राम प्रवेश यांचा यामध्ये प्रामुख्याने समावेश आहे. दरम्यान, हा सर्व्हे असून, तपासणीनंतर पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. सध्या काहीच जप्त करण्यात आले नसल्याचे समजते. अमरावतीत आयकर विभागाचे अधिकारी नागपूर पासिंगच्या वाहनाने आले आहेत.

# अरविंद चावरिया नवे पोलिस आयुक्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

पोलिस आयुक्त म्हणून मागील अडीच वर्षांपासून कार्यरत असलेले नवीनचंद्र रेड्डी यांची दोन दिवसांपूर्वी बदली झाली आहे. दरम्यान त्यांच्या रिक्त झालेल्या पदावर शुक्रवारी अरविंद चावरिया यांची अमरावती पोलिस आयुक्त म्हणून बदली झाली. ते लवकरच अमरावती पोलिस आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारणार आहेत.अरविंद चावरिया हे सध्या पुणे येथे अप्पर पोलिस आयुक्त (प्रशासन) पदी कार्यरत होते. राज्य शासनाच्या गृह विभागाने शुक्रवारी सायंकाळी राज्यातील पोलिस उप महानिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्यात. त्यामध्येच अरविंद चावरिया यांची अमरावती पोलिस आयुक्त म्हणून बदली केली. अरविंद चावरिया यांनी यापूर्वी छत्रपती संभाजी नगर येथे पोलिस उपायुक्त, बुलडाणा येथे पोलिस अधीक्षक यासह राज्यात विविध ठिकाणी सेवा दिली आहे.



# ऑपरेशन सिंदूरच्या समर्थनार्थ नांदगाव पेठ येथे उद्याला भव्य पदयात्रा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नांदगाव पेठ**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीत सैन्य दलाच्या समर्थनार्थ आणि भारतीय जवानांचे मनोबल वाढविण्यासाठी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आलं आहे. भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला. त्यानंतर, भारतीय सैन्य दल आणि भारत सरकारच्या समर्थनार्थ अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ येथे दिनांक १८ मे रोजी भव्य तिरंगा रॅलीच्ये आयोजन करण्यात आले आहे. तरी या रॅलीत सर्व देशभक्तांनी व देशप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन तिरंगा रॅलीचे जिल्हा संयोजक आर्की. राजेश्वर निस्ताने, व जिल्हा सहसंयोजक श्री तात्यासाहेब मेश्राम यांनी केले आहे.

ऑपरेशन सिंदूर च्या यशस्वीतेसाठी भारतीय सैनिकांच्या समर्थनार्थ आणि निष्पाप बळी गेलेल्या नागरिकांसाठी व शूरवीर सैनिकांसाठी सर्व देशभक्त व देशप्रेमींनी या पदयात्रेत मोठ्या संख्येने सहभागी व्हायचे असून या रॅलीची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज चौक, काशिनाथ बाबा मंदिर नांदगाव पेठ येथून दुपारी ठीक ४.०० वाजता होणार आहे. सदर पदयात्रेमध्ये भारतीय सैनिकांचे मनोबल वाढविण्यासाठी देशभक्ती गीत व घोषवाक्ये व प्रत्येकाच्या हाती तिरंगा राहणार असून नयनरम्य असे आयोजन असणार आहे. तरी या तिरंगा रॅलीमध्ये नांदगाव पेठ परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन देशाप्रती आपले कर्तव्य पार पाडावे. असे आवाहन सचिन इंगळे यांनी केले आहे.

